रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १५ ◆ अंक ३२६
www.ramprahar.com

बुधवार, १४ जून २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

कळंबोलीत तब्बल १७ लाखांची वीजचोरी/३
महाजनसंपर्क अभियानांतर्गत नवी मुंबईत आढावा बैठक/६
एशिया कपमध्ये भारताकडून हाँगकाँगचा धुव्वा/८

## पंतप्रधान मोदींकडून ७० हजार युवांना नोकरीचे नियुक्तीपत्र



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (दि. १३) देशातील ७० हजार युवांना नवनियुक्तीपत्र सुपूर्द केले आहे. याद्वारे तरुणाईला सरकारकडून विविध नोकऱ्या देण्यात येणार आहेत. त्यामुळे त्यांना हक्काचे रोजगार साधन उपलब्ध झाले आहे. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून हा कार्यक्रम झाला. या वेळी रोजगार मेळाव्याला संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी सांगितले की, रोजगार मेळाव्यामुळे एनडीए आणि भाजप सरकारला नवी ओळख मिळाली आहे. भाजपशासित सरकारेही अशा रोजगार मेळाव्याचे सातत्याने आयोजन करताहेत याबद्दल मला आनंद आहे. सध्या सरकारी नोकऱ्यांमध्ये भरती होणाऱ्यांसाठी हा काळ खूप महत्त्वाचा आहे. येत्या २५ वर्षांत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे लक्ष्य आहे.

# शेतकऱ्यांना १५०० कोटींची मदत

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या वर्षी सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीमुळे बाधीत शेतकऱ्यांना १५०० कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय मंगळवारी (दि. १३) मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. सुमारे १५.९६ लाख हेक्टर बाधित क्षेत्रातील २७.३६ लाख शेतकऱ्यांना ही मदत देण्यात येणार आहे.



### सततच्या पावसाने झालेल्या नुकसानीपोटी भरपाई देण्यास मंजुरी

सततचा पाऊस ही आपत्ती घोषित करून मदत देण्याबाबत मंत्रिमंडळाच्या ५ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला होता. त्याप्रमाणे सुधारित दराने व निकषानुसार मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाने राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे दर सुधारित केले आहेत. त्यानुसार जिरायती पिकांच्या नुकसानीसाठी प्रतिहेक्टर ८५०० रुपये, बागायती पिकांच्या नुकसानीसाठी १७ हजार रुपये आणि बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी २२५०० रुपये प्रति हेक्टर अशी दोन हेक्टरच्या मर्यादेत मदत देण्यात येईल.

### विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ

पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करून त्यांना अधिक प्रोत्साहन देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. उच्च प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा योजनेत आता पाचवीसाठी प्रति वर्ष पाच हजार रुपये आणि आठवीसाठी सात हजार ५०० रुपये अशी शिष्यवृत्ती राहील. गेल्या १३ वर्षांत यात वाढ झाली नसल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. आता पाचवीच्या विद्यार्थ्यांना दर महिन्याला ५०० रुपये आणि आठवीच्या विद्यार्थ्यांना दर महिन्याला ७५० रुपये शिष्यवृत्ती मिळेल. दरम्यान, संच एच व संच आयकरिता २० हजारपेक्षा कमी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा काढून टाकण्यात आली आहे.

### कंत्राटी ग्रामसेवकांचे मानधन वाढले

कंत्राटी ग्रामसेवकांच्या मानधनात १० हजार रुपये वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. सध्या या ग्रामसेवकांना सहा हजार रुपये दरमहिना मिळतात. आता १६ हजार रुपये मिळतील. राज्यात २७ हजार ९२१ ग्रामपंचायती असून १८ हजार ६७५ नियमित ग्रामसेवकांची पदे आहेत. त्यापैकी १७ हजार १०० पदे भरली असून १५७५ पदे रिक्त आहेत. सन २०००पासून ग्रामसेवकांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात येतात. कृषीसेवक, ग्रामसेवक, शिक्षणसेवक यांच्या मानधनात वाढ झाल्यामुळे कंत्राटी ग्रामसेवकांच्याही मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव होता.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर अपघातानंतर टँकर पेटला

## चार जणांचा होरपळून मृत्यू, तिघे जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर खंडाळा घाटात एका ऑइल वाहतूक करणाऱ्या टँकरचा मंगळवारी (दि. १३) अपघात होऊन आग लागली. या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला असून अन्य तिघे जखमी झाले आहेत. जखमींवर विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे.

एक्स्प्रेस वेवरून पुण्याहून मुंबईच्या दिशेने भरधाव वेगात निघालेल्या टँकरचा खंडाळा हद्दीत कुणे पुलावर अपघात झाला. त्यामुळे आग लागली. या वेळी टँकरमधील केमिकल हे एक्स्प्रेस वेवर पसरून खालून जाणाऱ्या जुन्या मुंबई–पुणे महामार्गावरही गेले. ही आग इतकी भीषण होती की तिच्या झळांमुळे ब्रिजखालील काही वाहनांनीदेखील पेट घेतला. या आगीत जीवित तसेच वित्त हानी झाली आहे.

जवळपास तीन तासानंतरही आग धुमसत होती. आग विझविण्यासाठी द्रुतगती मार्गावरील



सर्व आपत्कालीन यंत्रणा, खोपोली परिसरातील कंपन्यांचे अग्निशमन दल, खोपोली पालिका अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्तीचे प्रयत्न केले. ही आग नेमकी कशामुळे लागली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही, मात्र या अपघातामुळे दोन्ही मार्गांवरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. वाहतूक सामान्य करण्यासाठी वाहतूक पोलीस, देवदूत टीम व अन्य आपत्कालीन यंत्रणा कार्यरत होत्या. सायंकाळी वाहतूक सुरळीत झाली.

# विकासकामांसाठी पुढाकार महत्त्वाचा -लोकनेते रामशेठ ठाकूर

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या 2 कोटी 80 लाखांच्या निधीतून रस्त्यांची कामे



(छाया : विकास म्हात्रे)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विकासाच्या कामांसाठी पुढाकार महत्त्वाचा असतो, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मंगळवारी (दि. १३) केले. भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा पनवेल मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या दोन कोटी ८० लाख रुपयांच्या स्थानिक ग्रामविकास निधीतून तालुक्यातील वाकडी ते दुंदरेपर्यंतच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण आणि डांबरीकरण करण्यात येणार आहे. या कामांचा शुभारंभ लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. त्या वेळी ते बोलत होते.

पनवेल विधानसभा मतदारसंघात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली अनेक विकासकामांना गती प्राप्त झाली आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे वाकडी ते दुंदरेपर्यंतच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण आणि डांबरीकरण करण्यास सुरुवात झाली आहे. त्यांच्या दोन कोटी ८० लाख रुपयांच्या स्थानिक ग्रामविकास निधीमधून रस्त्यांचे काम करण्यात येणार आहे. यामध्ये चिंचवली ते दुंदरेपाडापर्यंतच्या रस्त्याचे दोन कोटी ३० लाख रुपये निधीमधून डांबरीकरण आणि दुंदरे गाव ते तामसाई फाटापर्यंतच्या रस्त्याचे ५० लाख रुपये निधीमधून काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या कामांचे भूमिपूजन लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या विकासकामांच्या शुभारंभावेळी भाजप पनवेल विधानसभा निवडणूक प्रमुख तथा जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, माजी उपसरपंच रमेश पाटील, नेरे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, नितीन पाटील, दुंदरेच्या सरपंच अनुराधा वाघमारे, उपसरपंच किशोर पाटील, माजी सरपंच नामदेव जमदाडे, अमोघ प्रशांत ठाकूर, शांताराम चौधरी, गुरूनाथ भोपी, वासुदेव भोपी, कृष्णा पाटील, **(पान २ वर..)**

## निवडक

### भारतासह पाकिस्तान, चीनमध्ये भूकंपाचे धक्के

**नवी दिल्ली :** भारत, पाकिस्तान आणि चीनमध्ये मंगळवारी (दि. १३) भूकंपाचे धक्के बसले. दिल्लीतील एनसीआर ते जम्मूपर्यंत हे धक्के जाणवले. या भूकंपाचे केंद्र जम्मू काश्मीरचे डोडा होते. रिश्टर स्केलवर या भूकंपाच्या धक्क्यांची तीव्रता ५.४ इतकी नोंदवली गेली. याआधी मार्च महिन्यातही भारतातील काही राज्यांना भूकंपाचे धक्के बसले होते.

### 'बिपरजॉय'मुळे गुजरातमध्ये २० हजार नागरिकांचे स्थलांतर

**गांधीनगर :** बिपरजॉय चक्रीवादळाचा गुजरातमधील सौराष्ट्र आणि कच्छ किनारपट्टीला धोका आहे. भारतीय हवामान विभागाने गुजरातमध्ये ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे या नैसर्गिक संकटाचा सामना करण्यासाठी प्रशासन सतर्क झाले असून आतापर्यंत जवळपास २० हजार नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आले आहे तसेच सर्व भागांत सतर्कतेच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

# रायगडाच्या पायथ्याशी दरड कोसळून दुकान, वाहनांचे नुकसान

## सुदैवाने पर्यटक बचावले

**महाड : प्रतिनिधी**

रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या चित्त दरवाजामध्ये मंगळवारी (दि. १३) दुपारी तीनच्या सुमारास दरड कोसळून





(छाया : महेश शिंदे)

किल्ल्यावर गेलेल्या पर्यटकांच्या तीन वाहनांचे नुकसान झाले आहे. त्याचप्रमाणे येथे व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकाच्या दुकानाचेदेखील नुकसान झाले. वाहनांमधील पर्यटक किल्ल्यावर गेले असल्याने सुदैवाने ते बचावले.

पावसानंतर रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या चित्त दरवाजामध्ये दरड कोसळून ती तेथे उभे असलेल्या वाहनांवर आली. या ठिकाणी लिंबू सरबतचा व्यवसाय करणाऱ्या अमर सावंत यांच्या दुकानावरदेखील दगड आल्याने दुकानाचे मोठे नुकसान झाले आहे.

रायगडावर ६ जूनच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी प्रचंड गर्दी झाली होती. तत्पूर्वी या सोहळ्यासाठी आलेला एक तरुण गडावर आलेल्या दरडीमध्ये सापडून मृत्युमुखी पडला होता. ही घटना ताजी असतानाच गडाच्या पायथ्याशी अशीच दरड आल्याने भीती व्यक्त केली जात आहे. उंच कड्याचे दगड उन्हामध्ये तापल्यानंतर पडलेल्या पावसात तत्काळ सुटून खाली येतात, असे येथील स्थानिक ग्रामस्थ अमर सावंत यांनी सांगितले.

# रायगड पोलीस भरतीमधील बोगसगिरी उघडकीस

## चार उमेदवारांना ठोकल्या बेड्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलात झालेल्या भरतीमधील बोगसगिरी उघड झाली आहे. भरती प्रक्रियेत चार उमेदवारांनी बोगस प्रमाणपत्र सादर केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या चारही उमेदवारांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात आणखी काही नावे पुढे येण्याची शक्यता आहे.



रोहित बबन मगर (रा. सोलापूर), केशव गिरजाजी मुरमुरे (रा. नांदेड), गोविंद सुखदेव ठाणगे (रा. बीड) आणि अच्युत भागवत माने (रा. बीड) अशी बोगस प्रमाणपत्र सादर केलेल्या उमेदवारांची नावे आहेत. राज्यात शासनाने पोलीस भरती प्रक्रिया राबवली. रायगड पोलीस दलात २७२ जागांसाठी डिसेंबर महिन्यात भरती प्रक्रिया सुरू झाली होती. हजारो उमेदवारांनी या भरती प्रक्रियेत सहभाग घेतला. मैदानी चाचणी, लेखी परीक्षेमध्ये पात्र झालेल्या २७२ जणांची अंतिम यादी पोलीस प्रशासनाने जाहीर केली होती. प्रकल्पग्रस्तांसाठीही राखीव जागा असल्याने प्रकल्पग्रस्त उमेदवार भरतीत उतरले होते.

दरम्यान, गडचिरोली जिल्ह्यात पोलीस भरतीत बोगस प्रमाणपत्र प्रकरण समोर आले होते. यामध्ये अलिबागमधील पोलीस शिपायाला अटक झाली होती. त्यामुळे प्रकल्पग्रस्त पात्र उमेदवारांचे प्रमाणपत्र तपासणीसाठी रायगड पोलिसांनी बीड, सोलापूर, नांदेड आणि इतर ठिकाणी आपले पथक पाठवून माहिती गोळा केली. या माहितीत रोहित बबन मगर, केशव गिरजाची मुरमुरे, गोविंद सुखदेव ठाणगे व अच्युत भागवत माने या चौघांनी बोगस प्रमाणपत्र देऊन शासकीय नोकरी मिळवण्याचा प्रयत्न केल्याची बाब समोर आली.

या चौघांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोगस प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र कोणी दिले? यासाठी किती रक्कम दिली? याबाबत पुढील तपास अलिबाग पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक दत्तात्रय जाधव करीत आहेत.

# गावठी आंब्यांना खवय्यांची पसंती



(छाया : धम्मशील सावंत)

**पाली : प्रतिनिधी**

खराब हवामान व अवकाळी पावसामुळे यंदा हापूस आंब्याच्या उत्पादनात घट झाली आहे. आवक कमी झाल्याने हापूस आंब्याचे दर हंगाम सरत चालला असला तरी कमी होण्याचे नाव घेत नाही. त्यामुळे हापूस आंबे खाणे सर्वसामान्यांसाठी अवघड होऊन बसले असून बाजारात गावठी आंबे दाखल झाल्याने खवय्ये त्यांची खरेदी करीत आहेत. किंमत कमी व नैसर्गिक पद्धतीने पिकलेले हे गावठी आंबे खवय्यांच्या पसंतीस उतरत आहेत.

यंदा जिल्ह्यातील आंब्याचे उत्पादन कमालीचे घटले आहे. शिवाय रत्नागिरी व देवगडचा हापूसदेखील थेट वाशी मार्केटला व मोठ्या बाजारात जात आहे. त्यामुळे स्थानिक बाजारात हापूस कमी दिसत आहे, परंतु सध्या अनेक आदिवासी जंगलातील किंवा परसबागेत लावलेल्या झाडावरील आंबे बाजारात टोपल्यांमध्ये घेऊन विक्रीसाठी येत आहेत. विविध फार्महाऊसच्या बागांमधील आंबेही विक्रीसाठी येत आहेत. या जोडीलाच कर्नाटकी, पायरी, तोतापुरी, नीलम, गावठी (बिटके) आदी विविध प्रजातींचे आंबेदेखील बाजारात उपलब्ध आहेत. खवय्ये ते खरेदी करताना दिसत आहेत.

हापूसच्या किमती आवाक्याबाहेर गेल्या आहेत. त्यात बाजारात हापूस फारसा उपलब्धदेखील नाही. त्यामुळे सध्या बाजारात उपलब्ध होत असलेले गावठी आंबे खरेदी करून खात आहोत, अशी प्रतिक्रिया खरेदीदार नागरिकांनी दिली.



(छाया : विजय मांडे)

# शालेय वस्तूंच्या खरेदीसाठी पालकांसह मुलांची गर्दी

**कर्जत : प्रतिनिधी**

नव्या शैक्षणिक वर्षात १५ जूनपासून शाळा सुरू होणार आहेत, तर काही शाळा सुरूदेखील झाल्या आहेत. म्हणूनच शाळेचा गणवेश, दप्तर, वह्या, पुस्तके व शालेपयोगी साहित्याच्या खरेदीसाठी पालकांसह मुलांची बाजारपेठेत गर्दी दिसून येत आहे.

उन्हाळी सुटीनंतर आता मुलांना शाळेचे वेध लागले आहेत. शाळेमध्ये नवीन वर्ग, नवीन मित्र अशा स्वप्नात रंगलेल्या विद्यार्थ्यांची शालेय साहित्य घेण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. बाजारपेठेत सध्या शालेय वस्तू उपलब्ध झाल्याने दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी दिसत आहे. गणवेश, दप्तर, रेनकोट, छत्री, पाणी बॉटल खरेदीत पालकांसह विद्यार्थी व्यस्त आहेत. मार्केटमध्ये नव्याने आलेल्या फॅन्सी स्कूल बॅग, रेनकोट खरेदीवर विद्यार्थ्यांचा जोर आहे.

# धाटाव एमआयडीसीतील कामगारांसह परिसरातील नागरिकांची सुरक्षा धोक्यात

**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक वसाहतीतील रोहा डाय कंपनीत सलग दुसऱ्यांदा आग लागल्याने कामगार आणि परिसरातील नागरिक भयभीत झाले आहेत. वाढत्या दुर्घटना लक्षात घेता कंपनी प्रशासनाने सुरक्षेचा गांभिर्याने विचार करून उपाययोजना करण्याची तसेच सर्व कारखान्यांचे संबंधित विभागाने सेफ्टी ऑडिट करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.




(छाया : जितेंद्र जाधव)

रोहा डाय कंपनीत मागच्या बुधवारी कंपनीच्या युनिट दोनमध्ये गोडावूनला भीषण आग लागली होती. या वेळी एकापाठोपाठ एक स्फोटही झाले. यात एक कामगार गंभीर जखमी झाला आहे. ही घटना ताजी असताना रविवारी दुपारी तीन ते साडेतीनच्या सुमारास पुन्हा मोठ्या प्रमाणात आग लागली. अग्निशमन दलाच्या जवानांनी काही वेळातच आग आटोक्यात आणली.

याबाबत माहिती देताना फॅक्टरी इन्स्पेक्टर केशव केंद्रे यांनी सांगितले की, रोहा डाय कंपनीत बुधवारी लागलेल्या आगीत जळालेले मटेरियल हे लाकडी पॅलेटवर ठेवल्याने रविवारी आग लागली. ही आग लगेच विझवण्यात आली.

> *रोहा डाय कंपनीत वारंवार अशा दुर्घटना का होतात याची कारणे शोधली पाहिजेत. कामगार व परिसरातील नागरिक यांची सुरक्षितता व आरोग्य लक्षात घेऊन धाटाव औद्योगिक वसाहतीतील सर्व कारखान्यांचे संबंधित विभागाने सेफ्टी ऑडिट करावे.*
> ***–राजेश डाके, सरचिटणीस, भाजप ओबीसी मोर्चा, दक्षिण रायगड***

# एक्स्प्रेस वेवर अडकलेल्या प्रवाशांसाठी गावकरी ठरले देवदूत

## ■ स्थानिकांकडून बिस्किटे आणि पाण्याचे वाटप

**पुणे : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील अपघातानंतर खोळंबलेली वाहतूक पुन्हा सुरू करण्यात आली आहे. तब्बल पाच तास सुरू असलेले रेस्क्यू ऑपरेशन संपले, मात्र या वेळी प्रवाशांना गावकऱ्यांनी मदत केली. तब्बल चार तास प्रवासी अडकले असताना स्थानिकांनी बिस्किटं आणि पाण्याचे वाटप केले. त्यामुळे एक्स्प्रेस वेवर माणुसकीचे दर्शन झाले.





पुणे-मुंबई एक्स्प्रेस वेवर झालेल्या भीषण अपघातात रसायनाने भरलेला एक टँकर जळून खाक झाला. या अपघातात होरपळलेल्या चौघांचा मृत्यू झाला असून, दोघं गंभीररित्या जखमी झाले आहेत. या अपघातामुळे दोन्ही बाजूंची वाहतूक ठप्प झाली होती. टँकरमधील मिथेनॉल महामार्गावरच्या पुलावर पसरले होते. तेच रसायन पुलाखालून दुचाकीवरून जात असलेल्या तिघांच्या अंगावर पडले. त्यानंतर काही कळायच्या आत त्या रसायनाने पेट घेतला. या दुर्घटनेत टँकरमधील आणि खालच्या मार्गावरील सहाजण होरपळले.

त्यापैकी चौघांचा मृत्यू झाला तर दोघे जखमी झाले. ही परिस्थिती संध्याकाळपर्यंत नियंत्रणात न आल्याने अनेक प्रवासी अडकून पडले होते. हजला जाणाऱ्यांची मुंबई विमानतळावर पोहचण्यासाठी धावपळ सुरू झाली. त्यामुळे देशातील सर्वोत्तम महामार्गावर यंत्रणेचा बोजवारा उडाल्याचे चित्र पुन्हा पहायला मिळाले.

पुणे-मुंबई एक्सप्रेस वेवरच्या या वाहतूक कोंडीत अडकलेल्यांसाठी आसपासच्या गावातील मंडळी देवदूतासारखी धावून आली. स्थानिकांनी त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था बघितल्याने तिथे माणुसकीचेही दर्शन घडले.

### तब्बल पाच तासांनी मिळाला दिलासा

तब्बल साडे पाच तासानंतर पुण्याहून मुंबईकडे जाणारी वाहतूक सुरू करण्यात आली. पुणे मुंबई एक्सप्रेस-वे वर केमिकल टँकरला आग लागल्याने अनेक प्रवासी पाच तासांपासून ताटकळत होते. यातच हजला जाणारे मुस्लिम बांधव फसले होते. सातार्‍यातून हे ते सकाळी ८ वाजता निघालेत आणि मुंबईच्या विमानतळावर चार वाजता पोहचायचे होते. त्यामुळे ते काही दूर बॅग घेऊन चालत निघाले होते.

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेत एकसूत्रता

## ६० हजारांहून अधिक बालकांना मिळणार लाभ

**मुंबई : प्रतिनिधी**

महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या बालसंगोपन योजनेच्या नावात बदल करण्यात आला असून महिला व बाल विकास विभागांतर्गत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या ६० हजारांहून जास्त बालकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. या योजनेसाठी यापूर्वी विभागाच्या असलेल्या वेगवेगळया मार्गदर्शक सूचनांमध्ये एकसूत्रता यावी यासाठी सर्वसमावेशक शासननिर्णय काढला असून या योजनेला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना असे नामकरण करण्यात आले आहे, अशी माहिती महिला व बालविकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

मंत्री लोढा म्हणाले की, ० ते १८ वयोगटातील अनाथ, निराश्रित, बेघर गरजू बालकांचे संस्थाबाह्य कौटुंबिक वातावरणात संगोपन व्हावे, त्यांना मुलभूत सुविधा मिळाव्यात व त्यांचा विकास व्हावा यासाठी शासनामार्फत बालसंगोपन योजना सुरू करण्यात आली होती. राज्यात राबविण्यात येत असलेल्या बाल संगोपन योजनेच्या आता एकत्रित सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्यामुळे या योजनेच्या लाभार्थीमध्ये एकसूत्रता येणार आहे. या नव्या योजनेत लाभार्थींच्या खात्यांत डीबीटी तत्वावर थेट निधी जमा होणार त्यामुळे निधी हस्तांतरणामध्ये होणारा अनावश्यक विलंब थांबणार आहे.

बालसंगोपन योजनेकरिता काम करण्यासाठी संस्था निवडीची सुधारित पद्धती राबविण्यात येणार आहे. त्यानुसार संस्थेला बालसंगोपन योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान १० संस्था व प्रत्येक संस्था जास्तीत जास्त २०० बालकांना लाभ देऊ शकेल. महिला व बाल विकास विभागांतर्गत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या ६० हजाराहून जास्त बालकांना लाभ देण्यात येणार आहे. प्रतिलाभार्थी प्रतिमहा २२५० रुपये, तर संस्थेस २५० रुपये असे एकूण २५०० रुपये अनुदान देण्यात येणार आहे.

अनाथ किंवा ज्यांच्या पालकांचा पत्ता लागत नाही व जी बालके दत्तक देणे शक्य नाही, एक पालक असलेली बालके, कौटुंबिक संकटात बाधित बालके, कुष्ठरुग्ण, कैद्यांची बालके, एचआयव्हीग्रस्त पालकांची बालके, तीव्र मतिमंद बालके, एचआयव्ही ग्रस्त किंवा कॅन्सरग्रस्त बालके, ४० टक्केपेक्षा अधिक अंधत्व, दिव्यांग बालके, भिक्षा मागणारी बालके, पोक्सो अधिनियमातंर्गत बळी पडलेली बालके, तीव्र कुपोषित बालके बालसंगोपन योजनेसाठी पात्र लाभार्थी बाल कल्याण समितीसमोर हजर राहून संबधित लाभार्थी बाल संगोपन योजनेसाठी पात्र आहे किंवा कसे याबाबत बालकल्याण समितीने प्रमाणित करणे बंधनकारक आहे.

# कामोठ्यात आज गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

## भाजप युवा मोर्चाचे हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चाचे कामोठे शहराध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे आणि इन्स्टिटच्यूट ऑफ पॅरामेडिकल एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा आणि मार्गदर्शन कार्यक्रम बुधवारी (दि. १४) आयोजित केला आहे.

या कार्यक्रमास भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर साहेब उपस्थित राहणार आहेत, तसेच नगरसेवक आणि इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत हा कार्यक्रम ज्ञानसाधना केंद्र सद्गुरु वामनराव पै सभागृह, सेक्टर ६, कामोठे येथे सायंकाळी ६ वाजता आयोजित केला आहे. या कार्यक्रमात दहावी आणि बारावीतील २०० गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि ट्रॉफी देऊन सन्मान केला जाणार आहे, अशी माहिती कामोठे शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी दिली.

# पनवेलमध्ये महिला दक्षता समितीची बैठक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलिसांच्या माध्यमातून वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करून विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. त्या अंतर्गत पनवेल शहरातील मंथन हॉलमध्ये पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पातिल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर (गुन्हे) यांनी घेतली. बैठकीत एकटे राहणारे ज्येष्ठ महिला, महिला व लहान मुले यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने सूचना करण्यात आला.



या वेळी पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील निर्जनस्थळी एकटे महिला अथवा मुली कोणी फिरायला जाऊ नये याची दक्षता घ्यावी. ग्रामीण भागात संशयित व्यक्ती, वाहन, अवैद्य धंदेबाबत माहिती निदर्शनास आल्यास पोलीस ठाणे ग्रुपवर माहिती देणे, आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ पोलीस मदतीकरिता ११२ क्रमांकावर संपर्क करण्यात यावा यासारख्या सूचना पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर (गुन्हे) यांनी महिला दक्षता कमिटीच्या सदस्यांना दिल्या. बैठकीला महिला दक्षता कमिटीच्या सदस्यांसह गोपनीय विभागाचे कुंवर, पंकज शिंदे उपस्थित होते.

# शेतकरी सन्मान योजनेंतर्गत खतांचे मोफत वाटप

**उरण : बातमीदार**

जनसेवेतून आनंद देणाऱ्या वशेणी इतिहास संपादकीय मंडळाने शेतकरी सन्मान योजना सुरू केली असून पहिल्या टप्प्यात उरण तालुक्यातील वशेणी आणि पुनाडे गावातील २०० शेतकऱ्यांना मोफत खत वाटप करण्यात आले.



या वेळी अनामिका म्हात्रे, इंडिया झिंदाबाद फ्रेण्डस गृप रायगडचे अध्यक्ष रमेश थवई, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ उरणचे अध्यक्ष महेंद्र गावंड, प्रिती पाटील, लवेश म्हात्रे, रमण पंडीत, बी. जे. म्हात्रे, गणेश खोत, डॉ. रवींद्र गावंड, मनोज गावंड, पुरूषोत्तम आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संदेश गावंड, अनंत तांडेल, गणपत ठाकूर, हरेश्वर पाटील यांनी विशेष मेहनत घेतली.

यंदाचे वर्ष हे वशेणी इतिहास संपादकीय मंडळाने शेतकरी सन्मान वर्ष म्हणून जाहीर केले असून शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध उपक्रम राबवण्यासाठी मंडळ प्रयत्न करेल, असा विश्वास कार्यवाहक मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांनी प्रास्ताविकात व्यक्त केला.

# कुडपण पर्यटन विकासासाठी दीड कोटींची तरतूद

## आमदार भरत गोगावले यांचा पुढाकार



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील विविध पर्यटनविषयक क्षेत्रांचा विकास करण्यासोबत स्थानिकांना त्या-त्या ठिकाणी रोजगार मिळवून देण्यासाठी शिवसेना-भाजप युती सरकारच्या माध्यमातून आपण प्रयत्नशील असून कुडपणसारख्या दुर्गम आणि ब्रिटीशकालीन हिलस्टेशनचा विकास करण्यासाठी तब्बल एक कोटी ६० लाखांची तरतूद केली आहे, अशी माहिती आमदार भरत गोगावले यांनी कुडपण येथे दिली.

या वेळी त्यांच्या हस्ते विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. मधले कुडपण येथे झालेल्या सभेसाठी माजी राजिप उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, कृउबा समितीचे संचालक लक्ष्मण मोरे, प्रभाकर पवार, जावजीबुवा, वसंत शेलार, उपतालुकाप्रमुख सतीश शिंदे, अविनाश शिंदे, विजयबुवा, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

या वेळी आमदार गोगावले यांनी, ऐतिहासिक पर्यटनस्थळासोबतच कुडपण हे सृष्टी सौंदर्याने नटलेले आणि थंड हवेचे ठिकाणही असल्याने याठिकाणी पर्यटनाला वाव असूनही यापुर्वी कोणीही रस्त्याशिवाय कोणतीही विकासकामे करू शकलेले नाही. त्यामुळे शिवसेना भाजप युतीसरकारच्या या काळातच कुडपणच्या पर्यटनविकासासाठी यंदा जशी तरतूद केली तशीच २०२४ मध्येही भरीव तरतूद करून कुडपणकरांना अनेक वर्षांपासून कोंडूशीमार्गे महाबळेश्वरला जोडणारा रस्ता पाहिजे होता तसाच विकास करून देऊ, असा विश्वास व्यक्त केला.


कुडपण येथील भिमाची काठी, पावसाळयात दरीत कोसळणारा धबधबा आदी पर्यटनस्थळांची पाहणी आमदार गोगावले यांनी केली. या वेळी एसएससी परिक्षेत चमकदार कामगिरी करणाऱ्या विद्यार्थिनीचा सत्कारही केला.

# ट्रेलर उलटून वाहतूक कोंडी

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीए बंदर-गव्हाण फाटा महामार्गावर मालवाहू कंटेनर ट्रेलर उलटल्याची घटना मंगळवारी (दि. १३) दुपारी ३ च्या सुमारास घडली. या अपघातामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती.

या अपघातात थोडक्यात रस्त्यावरून प्रवास करणारे प्रवासी बचावले आहेत, मात्र मालवाहू कंटेनरमधील सामान रस्त्यावर पडल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती. वाहतुक पोलीस यंत्रणेने तत्काळ अपघाताचे गांभीर्य ओळखून घटना स्थळी धाव घेऊन वाहतूक सुरळीत करण्यासाठी उपाययोजना केली आहे.



पान १ वरुन

## विकासकामांसाठी पुढाकार महत्त्वाचा -लोकनेते रामशेठ ठाकूर

विष्णू भगत, नवनाथ भोपी, नितीन काठवले, पोलीस पाटील दीपक पाटील, नारायण मढवी, नरेश वास्कर, नरेश चौधरी, गणेश उसाटकर, हरीशेठ पाटील, रामदास शेळके, दयेश जांभळे, सुनील शेळके, रूपेश पाटील, भागेश शेळके, सीताराम पाटील, बाळाराम गोंधळी, जाना शेळके, प्रकाश शेळके, विठ्ठल शेळके, नारायण शेळके यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.


महाराष्ट्र शासन

महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167

निविदा सूचना क्रमांक २० सन २०२३-२०२४

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा, रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना **दिनांक १४/०६/२०२३ रोजी सकाळी १०.०० पासून दिनांक २१/०६/२०२३ रोजी १८.०० वाजे** पर्यंत www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरून ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व **दिनांक २२/०६/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरून पाठविलेल्या निविदा शक्यतो दिनांक २२/०६/२०२३ रोजी ११.०० वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामीण रूग्णालय जसवली येथील रूग्णालयाची विशेष दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड . (२०५९) | ९८७१४६ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | श्रीवर्धन येथील धान्य गोदामाची विषेश दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (२०५९) | ९९५१०४ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | ग्रामीण रूग्णालय म्हसळा येथील रूग्णालयाची विशेष दुरूस्ती करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. (२०५९) | ९९५२१७ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | म्हसळा येथील तहसील कार्यालयाची विशेष दुरूस्ती करणे. तालुका म्हसळा,जिल्हा रायगड. (२०५९) | ९८७१०१ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | श्रीवर्धन येथील प्रशासकीय इमारतीची विशेष दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (२०५९) | ९८७२३५ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | श्रीवर्धन येथील आय. टी. आय बिल्डीगची विशेष दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (२०५९) | ९९५७६५ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | कोसे बु. जोडरस्ता ग्रा.मा. ५६ तयार करणे. तालुका माणगाव, जिल्हा रायगड. (५०५४,०४) | ८०९८३० | ९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | मौजे रानवली येथे दशक्रिया विधीसाठी शेड बांधणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (२५१५) | ६४७६९२ | ७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ९ | ग्रा.पं. मांदाड मौजे मांदाड येथे होळीचा मैदान सुशोभिकरण करणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. (२५१५) | २४४८५१ | ३००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग नऊ व वरील |
| १० | ग्रा.पं. पिटसई मौजे पिटसई मुळगांव येथे रस्ता काँक्रीटीकरण करणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. (२५१५) | २४४४१० | ३००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग नऊ व वरील |
| ११ | ग्रा.पं. गिरणे मौजे मालाठे येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका तळा,जिल्हा रायगड . (२५१५) | ४०७९८२ | ५००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| १२ | कांदळगांव बु. येथे ग्रा.मा. २६७ रस्ता तयार करणे. तालुका माणगाव, जिल्हा रायगड. (५०५४,०४) | ८०७३३१ | ९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १३ | पॉस्को महाराष्ट्र स्टील प्रा. लि. विळे भागाड एम.आय.डी.सी. येथे हेलीपॅड क्र २ बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (अनामत) | ८७०८७२ | ९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |

टिप :- १) तपशिलवार निविदा सुचना https://mahapwd.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील.

सही/-
(एम.आर.नामदे)
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/२४२३
दिनांक ०७/०६/२०२३

विमाका/ कोवि/२०२३-२०२४/६९

## निवडक

### अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**पनवेल :** एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला कोणीतरी अज्ञाताने पळवून नेल्याची घटना गव्हाण फाटा येथून घडली आहे. बेपत्ता मुलीची उंची पाच फूट दोन इंच, वर्ण सावळा, बांधा मजबूत, डोक्याचे केस काळे व लांब, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा गोल, अंगात चॉकलेट टॉप व काळी लेगीज पॅन्ट तसेच पायात चप्पल असे या मुलीचे वर्णन आहे. या मुलींबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक गणेश फडतरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### किरकोळ वादात बापलेकास मारहाण

**पनवेल :** किरकोळ वादात पितापुत्राला शिवीगाळ करून लोखंडी सळईने मारहाण केल्याची घटना शहरातील भारत नगर येथे घडली आहे. याप्रकरणी दोन जणांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रिक्षाचालक मोहम्मद हुसेन रफिक शेख (वय २३) याचे तो राहत असलेल्या पटेल मोहल्ला परिसरातील आरोपी गुफिज शेख (वय २८) आणि मुज्जीत शेख (वय २६) यांच्याबरोबर किरकोळ वाद झाला. याचा राग मनात धरून या दोघांनी मोहम्मद हुसेन रफिक शेख आणि त्याच्या वडिलांना शिवीगाळ करून लोखंडी सळईने मारहाण केली. याप्रकरणी दोघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक उध्दव सोळंके करीत आहेत.

### मार्केटमध्ये मोबाईलची चोरी

**पनवेल :** शहरातील कर्नाळा सर्कल भाजी मार्केटजवळ असलेल्या महाराष्ट्र बँकेच्या समोर अज्ञात व्यक्तीने एका निवृत्त शासकीय कर्मचाऱ्याचा मोबाईल चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवृत्त शासकीय कर्मचारी चंद्रकांत वडमारे यांचा १३ हजार रुपये किमतीचा काळ्या रंगाचा व मागील बाजुस निळ्या रंगाचा वन प्लस कंपनीचा NORD CE 2 LITE मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

### तळोजात घरफोडी; दागिने लंपास

**पनवेल :** घरातील तीन लाख ८७ हजारांचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना तळोजा फेज १ येथे घडली आहे. तळोजा फेज १, सेक्टर २, बागवान पैलेस येथे राहणाऱ्या मोहम्मद कादर शेख (वय ४०) यांच्या घरात कोणीही नसल्याचा फायदा उचलून अज्ञात चोरट्यांनी घराचे मुख्य प्रवेश द्वाराचा कोंडा तोडुन त्यावाटे आतमध्ये प्रवेश केला. त्यांनी घरातील सोन्याचा नेकलेस, अंगठी, हार, मंगलसूत्र, कानातील फुल, चांदीचे ब्रेसलेट, पैंजण असा एकूण तीन लाख ८७ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांनो सावधान!

## कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पनवेलमध्ये पोलिसांचा रूटमार्च

**पनवेल : वार्ताहर**

सध्या महाराष्ट्रात सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट व स्टेटस यामुळे पनवेल परिसरात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पनवेल शहर पोलीस सतर्क झाले आहेत. शहरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पनवेल शहर पोलिसांनी मंगळवारी (दि. १३) सकाळी पनवेल शहरातील विविध भागातुन रूटमार्च काढला.

सध्या महाराष्ट्रात सोशल मीडियावर महापुरूषांच्या आक्षेपार्ह पोस्ट व स्टेटस समाजकंटकांकडून वायरल होत असल्याने वारंवार राज्यभरात तणावाचे वातावरण निर्माण होत आहे. या घटनांची झळ पनवेल शहरात होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी पोलीस कर्मचाऱ्यांना सतर्कतेच्या सूचना दिल्या आहे. या पार्श्वभूमीवर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सकाळी पनवेल शहरातून रूटमार्च काढला.

या रूटमार्चला पनवेल शहर पोलीस ठाणे येथून सुरुवात झाली. त्यांनतर पनवेल शहरातील आदिल टॉवर, मुसलमान नाका, मोहल्ला परिसर, टपालनाका, पंचरत्न चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळ्याजवळ या रूटमार्चचा समारोप झाला. या रूटमार्चमध्ये पायी पथक, मोटरसायकली व इत्तर पोलीस अधिकारी आपल्या वाहनांसोबत सहभागी झाले होते.



## गुटखाविक्रेत्यांवर कारवाई; सव्वालाखांचा मुद्देमाल जप्त

**पनवेल : वार्ताहर**

शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा व इतर सुगंधी तंबाखू, पान मसाला यांचे रिक्षामधून विक्री करणाऱ्या एका व्यक्तीस पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून पनवेल शहर पोलिसांनी गुटखा व इतर सुगंधी तंबाखू यांच्यासह एक लाख २३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पनवेल शहर पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या करंजाडे वसाहतीत शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा व इतर सुगंधी तंबाखू, पान मसाला असा नशाकाराक पदार्थांची विक्री होत असल्याची माहिती पोलीस हवालदार परेश म्हात्रे यांना गुप्त बातमीदाराकडून मिळाली होती. त्यानुसार पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, हवालदार परेश म्हात्रे, नितीन वाघमारे, महेंद्र वायकर, नाईक रवींद्र पारधी, विनोद देशमुख, शिपाई प्रसाद घरत, नितीन कांबळे आदींच्या पथकाने सापळा रचत रिक्षामधून गुटखा व तंबाजूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या जुवेरअली अली हुसेन (वय ३२) याला ताब्यात घेतले.

जुवेरअलीकडून ७३ हजार ९४२ रुपये किमतीचे विविध कंपन्यांचे शासनाने प्रतिबंध केलेले गुटखा व इतर तंबाखूजन्य पदार्थ तसेच विक्रीसाठी वापरण्यात येणारी रिक्षा, असा एकूण एकलाख २३ हजार ९४२ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

## कळंबोलीत तब्बल १७ लाखांची वीजचोरी

### सहा जणांविरोधात गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

घरातील विद्युत मिटरमध्ये फेरफार करून तब्बल १७ लाखांची वीजचोरी उघडकीस आल्याची घटना कळंबोली परिसरात घडली आहे. याप्रकरणी एकाच कुटुंबातील सहा जणांविरोधात भारतीय विद्युत अधिनियम (सुधारणा) २००३ कलम १३५ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

कळंबोली वसाहतीमधील यादव कुटुंबीयांना आपल्या सेक्टर १२ प्लॉट नंबर ए/१५ मधील रो-हाउस आणि सेक्टर १४ मधील ए/५२ या घरांमध्ये असलेल्या पाच विद्युत मिटरमध्ये फेरफार करून चोरी करत होते. याचा संशय आल्यानंतर महाराष्ट राज्य विद्युत वितरणमधील वाशी भरारी पथकाचे सहाय्यक अभियंता कपिल गाठले यांनी धाड टाकल्यानंतर हि चोरी पकडली. गेली अनेक वर्षे हे कुटुंब घरातील विद्युत मिटरमध्ये फेरफार करून वीजचोरी करत होते. या कुटुंबीयांनी तब्बल १७ लाखांची वीजचोरी केल्याचे उघडकीस आले.

याप्रकरणी सहाय्यक अभियंता कपिल गाठले यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी आरोपी रवी यादव (वय २९), रमेश यादव (वय ६०), रामुदलार यादव (वय ९०), दिनेश यादव (वय ५०), चंद्रजीत यादव (वय ५३) इंद्रजित यादव (वय ५५) यांच्याविरुद्ध भारतीय विद्युत अधिनियम (सुधारणा) २००३ कलम १३५ प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

## महापालिकेने सुधारित नोटीस द्याव्यात; ॲड. मनोज भुजबळ यांची मागणी

**पनवेल : प्रतिनिधी**

महापालिकेने पूर्वीच्या पनवेल नगरपालिका हद्दीतील मुळ मालकांना नियमित कर भरला असूनही पाच वर्षांचा कर भरण्याची नोटीस पाठवली आहे. या नोटीसमध्ये मालकऐवजी धारक असा उल्लेख केला आहे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या मनात संभ्रम निर्माण झाल्याने याबाबत माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी मालमत्ता कर संकलनाचे उपायुक्त गणेश शेट्ये यांच्याकडे तक्रार करून ती नोटीस बदलून देण्याची विनंती केली आहे.

पनवेल महापालिका स्थापन होण्यापूर्वी नगरपालिका हद्दीत असलेल्या व सध्या प्रभाग ड मध्ये असलेल्या पोदी नंबर १,२,३, भुजबळ वाडी व भुजबळ मळा येथील घरमालकांना करासंबंधी नोटीस पाठवताना त्यामध्ये त्यांचा जुना घर क्रमांक नोंदवलेला नाही. त्यामुळे नवीन नंबरप्रमाणे दिलेली नोटीस कोणत्या घराची, चाळीची किंवा फ्लॅटची ते एका पेक्षा जास्त घरे असणाऱ्या मालकांच्या लक्षात येत नाही. नगरपालिका हद्दीतील घरपट्टी महापालिका झाल्यापासून म्हणजेच २०१६पासून २०२३पर्यंत भरलेली असताना ही कोणतीही शहानिशा न करता पुन्हा पाच वर्षाची नोटीस पाठवली आहे. या नोटीसवर मालकऐवजी धारक असा उल्लेख केलेला आहे. यामुळे सर्वसामान्य लोकांच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे महापालिकेने पाठवलेल्या चुकीच्या नोटीसमध्ये बदल करून सुधारित नोटीस पाठवाव्यात, अशी मागणी ॲड. मनोज भुजबळ यांनी मालमत्ता कर संकलनाचे उपायुक्त गणेश शेट्ये यांच्याकडे पत्र देऊन केली आहे.



**पनवेल : महापालिकेचे माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा यांच्या नेतृत्वाखाली कळंबोली येथील स्टील चेंबर व्यावसायिक व्यापारी असोसिएशनमध्ये भाईचारा पॅनलचा दणदणीत विजय झाला. त्या निमित्ताने भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी निवडून आलेल्या सर्व सदस्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उरणसाठी प्रमुखपदी तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने रायगड जिल्हा परिषद नियोजन समितीच्या विशेष निमंत्रित सदस्यपदी निवड झाली आहे. त्याबद्दल गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजचे प्रभारी प्राचार्य मंडले, पर्यवेक्षिका मोहिते, शिक्षिका ज्योत्स्ना ठाकूर, लेखनिक मडवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे, कर्मचारी खारकर व अरुण कोळी यांनी शुभेच्छा दिल्या. दरम्यान, रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी शिक्षिका ज्योत्स्ना ठाकूर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अरुणशेठ भगत यांनी या वेळी अभिनंदन केले.**



**पनवेल : तालुक्यातील न्हावा ग्रामपंचायतीच्या वतीने दिव्यांगांना मिळणाऱ्या पाच टक्के निधीचे व लॅपटॉपचे वाटप करण्यात आले. या वेळी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच प्रल्हाद पाटील, सदस्य किसन पाटील, सागरशेठ ठाकूर, देवेंद्र भोईर, निर्मला ठाकूर, कल्पना घरत, अमृता पाटील, विजया ठाकूर, मंजुषा ठाकूर, साधना तांडेल, गायकवाड गुरुजी आदी उपस्थित होते.**



## पनवेलमध्ये रिक्षांवर कारवाई

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल शहर हद्दीत वाहतूक शाखेच्या पोलिसांनी पनवेलमध्ये मीटरप्रमाणे रिक्षा चालवत नसल्याबाबत अनेक तक्रारी आल्याने मंगळवारी (दि. १३) अचानक तपासणी केली असता. पाच विनामीटर चालणाऱ्या रिक्षा पकडण्यात आल्या. त्यांच्यावर आरटीओमार्फत कारवाई करण्यात आली.

पनवेल शहर हद्दीत काही रिक्षाचालक हे मीटरप्रमाणे रिक्षा चालवत नसल्या बाबत अनेक तक्रारी येत असल्याने वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे मंगळवारी सकाळी १० वाजता वाहतूक शाखेचे उपनिरीक्षक महाडीक व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी खासगी वेशात बोगस प्रवासी बनून काही रिक्षांची तपासणी केली.

## जलवाहिनी फुटल्यास शांतिवन सोसायटीतील रहिवाशांना धोका

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेलमधील सेक्टर १५ मधील एमजेपीची जुनी जलवाहिनी अनेक ठिकाणी फुटून त्यातून मोठ्या प्रमाणात पाणी तर वाहून जात आहेच, पण ती फुटली तर येथील शांतिवन सोसायटीतील रहिवाश्यांच्या जुन्या बिल्डिंगला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे वित्त व जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तक्का गावाकडून येणारी एमजेपीची पाण्याची मोठी जलवाहिनी नवीन पनवेल स्टेशन जवळ सेक्टर १५मध्ये असलेल्या आयपीसीएल कॉलनी म्हणजेच सिडकोने बांधलेल्या पी-६ वसाहती जवळून जाते. येथील शांतिवन सोसायटीतील बिल्डिंग क्रमांक १७ आणि १९जवळून जाणारी ही जलवाहिनी अनेक ठिकाणी फुटलेली आहे. याबाबत तक्रार केल्यावर जुजबी दुरूस्ती केली जाते. त्याचा काहीच उपयोग होत



> **आम्ही एमजेपीच्या अधिकाऱ्यांकडे या जलवाहिनीबद्दल २०२२ पासून करार करीत आहोत, पण त्याची योग्य ती दाखल घेतली जात नाही. या पावसाळ्यात जुनी जलवाहिनी फुटली तर P6 (जुनी आयपीसीएल कॉलनी) येथे राहणाऱ्या आम्ही काय करायचे?**
> **-रवी पवार, माजी सैनिक**

नसल्याचे अनेक वर्षे दिसून येत आहे.

यावर्षीदेखील एमजेपीने सेक्टर १६ पर्यंत नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम अर्धवट केले आहे. त्यापुढील जुनी जलवाहिनी अनेक ठिकाणी फुटलेली दिसते. त्यांची कोणतीही दुरूस्ती सोसायटीने अनेक विनंत्या करूनही केली जात नाही. आयपीसीएल वसाहत ही सिडकोने २५ वर्षांपूर्वी बांधलेली आहे. बिल्डिंगची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. अशा परिस्थितीत जर ही जलवाहिनी फुटली तर या बिल्डिंग्सलाही धोका निर्माण होऊ शकतो. त्यानुळे जीवितहानी आणि वित्तहानी होऊ शकते.

## संजय जैन यांच्यातर्फे शालेय वस्तूंचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

भारतीय जनता पक्षाचे पनवेल शहर खजिनदार आणि समाजसेवक संजय जैन यांनी आपला वाढदिवस लहान मुलांना शालेय वस्तूंचे वाटप करून लहानग्यांच्या साथीने साजरा केला.

भारतीय जनता पक्षाचे पनवेल शहर खजिनदार समाजसेवक संजय जैन यांचा वाढदिवस सामाजिक बांधिलकीद्वारे झाला. वाढदिवसानिमित संजय जैन यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.

संजय जैन आपला वाढदिवस दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवा साजरा करत असतात. यंदाही त्यांनी वाढदिवसानिमित्त पनवेल शहरातील लक्ष्मी वसाहत येथे ओम साई मित्र मंडळातर्फे लहान मुलांना शालेय वस्तूंचे वाटप केले. या वेळी संजय जैन यांचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला. उपस्थितांनी जैन यांना शुभेच्छा दिल्या.



## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सामंजस्य करार

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. १०) नेचर्स क्लब समिती व थेरको रिसायकलिंग एलएलपी (अंधेरी, मुंबई) या दोन्ही संस्थेमध्ये सामाजिक करार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी गरीमा जिंदल (मुख्य व्यवस्थापक) हे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट लिखित स्वरूपात एम.ओ.यू मधून दोन्ही संस्थेच्या ज्ञान व संसाधनांमध्ये आवश्यक योगदान देण्याची हमी देऊन करार हस्तांक्षरित करण्यात आला. या एम.ओ.यु. मधून महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थी, विद्यार्थिनींना व प्राध्यापकांना इलेक्ट्रॉनिक वेस्ट व्यवस्थापनासाठी वेगवेगळे ट्रेनिंग प्रोग्रॅम घेण्यात येतील अशी हमी या वेळी दिली.

या कार्यक्रमांमध्ये प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड व सामंजस्य करार समितीच्या समन्वयक तसेच प्रा. महेश्वरी झिरपे (समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष) प्रा. नम्रता परीक, प्रा. योगिता पाटील, प्रा. डॉ. धनवी आवटे, प्रा. प्रतीक्षा पाटील हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आयोजकांची प्रशंसा केली. तसेच आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुण शेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वा.टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.



## संपादकीय


# केंद्रात नरेंद्र, राज्यात देवेंद्रच!

पावसाची चाहूल लागली की बेडकांची डराव डराव ऐकू येऊ लागते. काही बेडक्या अकारण फुगतात. त्याचे प्रत्यंतर महाराष्ट्राच्या राजकारणात दररोज दिसतेच आहे.

**जनमताचा धडधडीत अपमान करून उद्धव ठाकरे यांनी हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना कट्टर विरोधक राहिलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या दावणीला बांधली. केवळ मुख्यमंत्री पदाच्या खुर्चीसाठी जनमत लाथाडण्याचे पाप त्यांनी साडेतीन वर्षांपूर्वी केले. त्याचे फळ त्यांना अडीच वर्षांतच मिळाले. ठाकरे यांच्या कुटुंबकेंद्रित राजकारणाला कंटाळलेल्या चाळीस आमदारांनी ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उठाव केल्याने ठाकरे यांची खुर्ची गेली आणि शिंदे त्यावर विराजमान झाले. अर्थात, हा पराक्रम शिंदे यांना एकट्याच्या बळावर करता आलाच नसता. भारतीय जनता पक्ष त्यांच्या मागे ठामपणाने उभा राहिला म्हणूनच त्यांचा उठाव यशस्वी झाला. इतकेच नव्हे तर सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेलेली कायदेशीर लढाई शिंदे यांना जिंकता आली कारण मोठमोठ्या वकिलांची आणि घटनातज्ज्ञांची फौज भाजपने त्यांच्यामागे उभी केली. वास्तविक भाजपकडील आमदारांची संख्या शिवसेनेपेक्षा जवळपास दुप्पट आहे. तरीही शब्द दिल्याप्रमाणे मुख्यमंत्रीपद शिंदे यांच्याकडे सोपवून देवेंद्र फडणवीस यांनी शिस्तबद्ध कार्यकर्त्याप्रमाणे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारले. वर्षभरातच भराभर निर्णय घेणारे गतिमान सरकार असा लौकिक शिंदे-फडणवीस सरकारला प्राप्त झाला. त्यामागे फडणवीस यांचा अनुभव आणि बुद्धिचातुर्य हेच आहे. असे असतानाही मंगळवारी सर्व दैनिकांच्या पहिल्या पानावर शिवसेनेतर्फे जी जाहिरात प्रसिद्ध झाली त्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या. केंद्रात मोदी आणि राज्यात शिंदे असा संदेश देणारी ही जाहिरात महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ माजवणारी ठरली. इतकेच नव्हे तर शिंदे यांची लोकप्रियता फडणवीस यांच्यापेक्षा काकणभर सरसच आहे अशी कुठल्याशा सर्वेक्षणातील आकडेवारी या जाहिरातीत देण्यात आली आहे. जाहिरातीतील हे दावे वाचल्यानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांना हसावे की रडावे हेच कळेनासे झाले. फडणवीस यांची लोकप्रियता कमी झाली असल्याचे सुचवणारी ही जाहिरात शिवसेनेतील अनेकांनाही पटली नसेल. या जाहिरातीत फडणवीसांचे छायाचित्र नाही तसेच हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचेही छायाचित्र नाही. त्यामुळे ही जाहिरात खरोखरच शिवसेनेनेच दिली आहे का असा प्रश्न अनेकांना पडला. भाजपचे ज्येष्ठ नेते प्रवीण दरेकर यांच्यासह अनेक नेत्यांनी या वादग्रस्त जाहिरातीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तर शिंदे समर्थक नेते आणि मंत्री दीपक केसरकर यांनी जाहिरातीत चुका असतील तर सुधारून घेऊ अशी नरमाईची भूमिका घेतली. कोल्हापूर येथे एका कार्यक्रमाला मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस एकत्र जाणार होते. परंतु सायनसच्या आजारामुळे फडणवीस यांनी कोल्हापूर दौरा रद्द केल्याने भिवया आणखीनच उंचावल्या. वास्तविक शिंदे-फडणवीस सरकारचे काम अतिशय चांगल्या पद्धतीने चालले आहे. मोठमोठे निर्णय वेगाने घेतले जात असून परकीय गुंतवणुकीच्या बाबतीत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकाला पोचला आहे. विकास कामे धडाधड पार पडत आहेत. भाजप आणि शिवसेना यांची महायुती ही जनतेच्या मनातलीच युती आहे. तिला तडे जावेत असे कोणालाच मनापासून वाटत नाही. भाजपसारखा बलाढ्य साथीदार नसता तर हे दिवस दिसले नसते ही वस्तुस्थिती शिंदे यांच्या समर्थकांनी लक्षात ठेवली पाहिजे. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांना पर्याय नाही ही खूणगाठ सर्वांनीच बांधून ठेवावी.**

# पनवेल एसटी आगार होतेय चकाचक!






**खबरबात**
**नितीन देशमुख**

एसटी स्थानक म्हटले म्हणजे अस्वच्छता बसायला मोडकी बाके, आजूबाजूला मारलेल्या पिचकाऱ्या आणि अस्वच्छ शौचालय हे चित्र डोळ्यासमोर येते, पण पनवेल एसटी स्थानकावर गेल्यावर सध्या वेगळेच चित्र पाहायला मिळत आहे. स्वच्छ फलाट तेथे ठेवलेल्या कुंड्या लक्ष वेधून घेतात. आजूबाजूचा परिसर ही स्वच्छ दिसतो आहे. त्यामुळे आपल्याला पनवेल स्थानकाचे रूप बदलेले पाहायला मिळत आहे.

मुंबईचे प्रवेशद्वार समजल्या जाणाऱ्या पनवेल मधून कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ येथून येणाऱ्या-जाणाऱ्या हजारो एसटीच्या गाड्या पनवेल स्थानकावर येत असतात त्यातून दररोज हजारो प्रवाशी येत-जात असतात. याशिवाय नोकरी-धंद्यासाठी आजूबाजूच्या परीसरातून हजारो नागरिक या स्थानकातून प्रवास करतात. या स्थानकाच्या नुतनीकरणाचा प्रश्न तांत्रिक अडचणीत रेंगाळला असला तरी सध्या हे स्थानक कात टाकते आहे, असे म्हणायला हरकत नाही. प्रवाशांना सुरक्षित प्रवासासोबत स्वच्छ आणि प्रसन्न वातावरण देण्याच्या उद्देशाने १ मे रोजी मुख्यमंत्र्यांनी 'हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियान' जाहीर केले. रस्त्यावर धावणारी प्रत्येक बस स्वच्छ असेल, बसस्थानक व परिसर स्वच्छ व टापटीप असेल याबरोबरच प्रत्येक बसस्थानकावरील प्रसाधनगृहेही स्वच्छ व निर्जंतुक असतील याची खबरदारी घेण्यास सांगितले. त्यामुळे आता पनवेल स्थानक ही स्वच्छ दिसू लागले आहे.

एसटी महामंडळाचा अमृत महोत्सव साजरा होण्यापूर्वी पनवेल आगार प्रमुख म्हणून सुजीत डोळस यांनी पदभार घेतल्यावर पनवेल स्थानकातील अडचणी समजून घेतल्या. त्यांनी प्रथम आगाराची स्वच्छता हाती घेतली. खासगी सफाई कामगार पुरवणाऱ्या एजन्सीकडून माणसे घेऊन आवारात वाढलेली झाडे झुडपे साफ केली. आवारातील कचरा दोन तासांनी उचलला जातो का नाही याची तपासणी केली जाते. येथील खाद्यपदार्थांच्या स्टॉलसमोर कचरा दिसल्यावर लगेच त्याच्यावर कारवाई करण्यात येत आहे. स्थानकातील शौचालय गलिच्छ झाली होती ती दर दोन तासांनी पाणी ओतून स्वच्छ केली जाऊ लागली. प्रवासी त्याचा वापर करू लागल्याने परिसरातील दुर्गंधी कमी झाली. आगारातून बाहेर पडताना गाडी स्वच्छ आहे का नाही याची तपासणी करूनच गाडी मार्गस्थ करण्यात येते. पनवेल आगारातून बाहेर पडताना दोन्ही गेटवरील गटारे तुंबली होती घाण पाणी रस्त्यावर येत होते. त्याबाबत महापालिकेला सांगून आता गटाराचे बांधकाम सुरू झाले आहे.

हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियानामध्ये लोकांच्या सहभागातून स्थानक स्वच्छ कारचे असल्याने विविध सामाजिक संस्था व लोकप्रतिनिधी यांचेकडे संपर्क साधून आगारात सुशोभीकरण करण्याचा प्रयत्न सध्या सुरू आहेत. सोमवारी भाजपचे ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष व प्रवासी वाहतूक सामाजिक संस्था, पनवेलचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ व सदस्य अशोक आंबेकर यांनी स्थानकाला भेट दिली. त्यांना येथील स्वच्छता आवडली फलाटावर कचरा टाकण्यासाठी कुंड्या कमी असल्याचे निदर्शनास आल्यावर त्या पुरवण्याची तयारी दर्शवली. याशिवाय एक दिवस ५० सफाई कामगार घेऊन येथील सफाई करून देणार असल्याची सांगितले. फलाटाचे बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत अनेकवेळा प्रवासी विधी करतात, म्हणून त्याठिकाणी उद्यान करण्यासाठी सभागृह नेते परेश ठाकूर यांना सांगून मदत करण्याची तयारी दर्शवली. आगार प्रमुख स्वत: फलाटावर उभे राहून पनवेल आगाराच्या गाडीत लोकांना रांगेत प्रवेश देतात हे पाहून त्यांनी त्यांचे कौतुक केले.

### कर्मचारी व प्रवाश्यांमध्ये स्वच्छतेबद्दल जाणीव-जागृती

बसेस, बसस्थानक व परिसर, प्रसाधनगृहे स्वच्छ करण्याची जबाबदारी एसटीच्या स्वच्छतेसाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांची असली तरी बसमध्ये व बसस्थानकावर स्वच्छता राखणे, यासाठी प्रवाशांमध्ये जनजागृती करणे तितकेच महत्त्वाचे आहे. याकरिता स्वच्छतादूत नेमून त्यांच्यामार्फत प्रवासी जनतेचे स्वच्छतेबाबत प्रबोधन करणे व त्यांचा सकारात्मक सहभाग नोंदवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यासाठी भित्तिपत्रके, सूचना वजा सुभाषिते, उद्घोषणा, यांचा प्रभावी वापर करून एसटी कर्मचारी व प्रवासी यांच्यामध्ये स्वच्छतेबद्दल जाणीव-जागृती घडवून आणण्याचा संकल्प केला आहे.

**आमचा प्रवाशांना स्वच्छ गाडी पुरवणे व बस स्थानक स्वच्छ ठेवणे हा मुख्य उद्देश आहे, पण त्यासाठी प्रवाश्यांनी ही साथ देणे गरजेचे आहे. तसे झाले तर मुख्यमंत्र्यांच्या व प्रवशांच्या स्वप्नातील स्वच्छ स्थानक देणे शक्य होईल. प्रवाशांनी स्वयंम शिस्त पाळणे गरजेचे आहे. रांगेत गाडीत प्रवेश केला तर महिला व ज्येष्ठ नागरिकांना व्यवस्थित चढता येते. पाकीटमारी आणि चोरीच्या घटना कमी होऊ शकतात.**
**-सुजीत डोळस, आगार प्रमुख, पनवेल**

**कोरोनानंतर प्रथमच पनवेल आगारात आलो. येथील स्वच्छता पाहून समाधान वाटले. आगार प्रमुखांची त्याविषयीची तळमळ पाहून त्यांना महापालिका व आमच्या संस्थेतर्फे मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. प्रवाशांना रांगेचे शिस्त लागल्यास पाकीटमारी आणि चोरीच्या घटना कमी होऊ शकतात त्यामुळे प्रवाश्यांनी त्यांना सहकार्य करणे गरजेचे आहे.**
**-ॲड. मनोज भुजबळ, अध्यक्ष, प्रवासी वाहतूक सामाजिक संस्था**

**आमच्या कर्मचाऱ्यांनी कचरा उचलला की, लगेच त्या ठिकाणी काही प्रवासी हातातील कागद किवा प्लास्टिकची रिकामी बाटली टाकतात. फलाटावर कचऱ्याची कुंडी ठेवलेली आहे. त्यामध्ये टाकत नाहीत. त्यांनी कचरा कुंडीत टाकणे गरजेचे आहे.**
**-रेणूका सोनवणे, सुपरवायझर, सफाई कामगार**

**मी दररोज महाविद्यालयात जाण्यासाठी पनवेलला येतो. त्यामुळे पनवेल एसटी स्थानकामध्ये आल्यावर मला नेहमीच स्थानकात खूप घाण पडलेली दिसायची. सध्या स्वच्छता दिसते. येथे फलाटावरील ठेवलेल्या कुंड्यांमुळे खूप छान वाटते.**
**-जय कसारे, महाविद्यालयीन विद्यार्थी**

## बदलते तंत्रज्ञान

### आता डेबिट कार्डशिवाय युपीआय पिन सेट करू शकता




जर तुम्ही गुगल पे वापरत असाल तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. गुगल पेने आपल्या यूजर्ससाठी एक खास फीचर आणले आहे. नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडून (NPCI) तुमचा आधार क्रमांक वापरून नव्याने सादर करण्यात आलेल्या सर्व्हिसमुळे UPI साठी रजिस्ट्रेशन करणे सोपे झाले आहे. गुगल पेच्यानुसार, आधार बेस्ड सर्व्हिस वापरून लाखो भारतीय युजर्सचे काम सोपे केले जाते.


भारतात ४०० कोरोडहून अधिक लोक डिजिटल पद्धतीने व्यवहार करतात, असे एका नवीन रिपोर्टमधून समोर आले आहे. भारतात किराणा, ऑनलाइन फूड डिलिव्हरी आणि टुरिज्म यासारख्या अनेक मोठ्या क्षेत्रांमध्ये ८० टक्क्यांहून अधिक व्यवहार ऑनलाइन केले जातात. याचबरोबर, PhonePe, Google Pay, Paytm आणि Cred चा UPI- आधारित पेमेंटमध्ये ९५ टक्क्यांहून अधिक बाजारातील हिस्सा आहे, असेही रिपोर्टमध्ये सांगण्यात आले आहे.

अलीकडील आधार आधारित UPI सर्व्हिससह, Google Pay युजर्स आता डेबिट कार्ड न वापरता आपला पिन सेट करू शकतील. सध्या ही सुविधा फक्त बँक खातेदारांसाठी उपलब्ध आहे. UIDAI च्या डेटानुसार, भारतातील ९९.९ टक्क्यांहून अधिक वयस्क लोकांकडे आधार कार्ड आहे आणि ते महिन्यातून एकदा तरी त्याचा वापर करतात. आधार बेस्ड सर्व्हिसनंतर तुम्हाला एटीएम कार्डसह पिन सेट करण्यापासून सुटका मिळेल.

**कसा करावा फीचरचा वापर?**

आधार बेस्ड UPI चा वापर करण्यासाठी तुम्हाला आधार आणि बँकेकडे आपला रजिस्टर्ड मोबाइल नंबर आवश्यक असणार आहे. यानंतर युजर्स Google Pay वर डेबिट कार्ड किंवा आधार बेस्ड UPI अनबोर्डिंग यापैकी एक निवडण्यास सक्षम असतील. आधारचा पर्याय निवडल्यानंतर, तुम्हाला तुमच्या आधार कार्डचे सुरुवातीचे ६ अंक प्रविष्ट करावे लागतील. यानंतर तुम्हाला तुमच्या रजिस्टर्ड मोबाईल नंबरवर एक OTP मिळेल. OTP टाकल्यानंतर तुम्ही त्याचा वापर करू शकाल.

# जागतिक रक्तदाता दिनानिमित्त...!



**निमित्त**

रक्त द्या, प्लाझ्मा द्या, वारंवार द्या, एखाद्याच्या जीवनाचा हिस्सा बना ! हँलो, मी रक्तदाता बोलतोय, मला समजले की, आपल्या रुग्णास रक्ताची गरज आहे...मी रक्तदान करण्यास तयार आहे...! असा रक्तदाता नेहमीच रुग्णांसाठी आशेचा किरण ठरला आहे. आजच्या युवापिढीत समज गैरसमज दूर करणे काळाची गरज आहे. आजच्या काळात सोशल मीडियाचा योग्य वापर केल्यास सहज शक्य होऊ शकते?

स्वैच्छिक रक्तदाता म्हणून आपण जेवढे समाजातील लोकांना जागृत कराल तेवढी माहिती जनमानसात रुजेल. आजकाल सोशल मिडिया, डिजिटल मिडिया प्रिंट मिडिया आदी माध्यमातून समाजात जनजागृती करतांना पाहायला मिळते. रक्ताची गरज कुणालाही असो, व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून सर्वांपर्यत मेसेज पोहचला जातो. यात सामाजिक बांधिलकी जोपासणारे रक्तदात्यांचा सिंहाचा वाटा आहे. आज पावतो आपल्या देशात अनेक प्रगतीच्या वाटा निर्माण झाल्या पण मानवी रक्तासाठी कोणत्याही पर्याय आजपावतो मिळाला नाही. रक्त हे कुठल्याही प्रयोगशाळेत तथा कारखान्यात तयार होत नसते, हे आजही सर्व सामान्य माणसाला माहीत आहे. पण ते तयार होते तुमच्या आमच्या मानवी शरीरात...! याबाबतीत समाजात रक्तदानाविषयी सामाजिक बांधिलकी आपल्या जनमानसात रुजणे आवश्यक आहे.

एकेकाळी रक्त मिळण्यासाठी रुग्णांच्या नातेवाईकांना भरपूर ठिकाणी संपर्क साधवा लागत होता, पण शासनाच्या मार्गदर्शक ध्येय धोरण तसेच शासकीय पातळीवर जनमानसात पोहोचल्यामुळे अनेक युवक रक्तदान करण्यासाठी पुढे येतात, याचे कारण ही तसेच आहे...? आपल्या रुग्णांना रक्त मिळणार तरी कोठून?आपणच रक्तदान नाही केले तर रुग्णांना जीवदान मिळणार कसे? ही भावना आतापर्यंत सर्व जनमानसापर्यंत पोहचणे आपली सामाजिक बांधिलकी आहे. यासाठी शासनाच्या माध्यमातून प्रभातफेरी, स्वैच्छिक रक्तदान शिबिरे, पोस्टर्स स्पर्धा, इ. रक्तदात्यांमध्ये जनजागृतीपर प्रयत्न केला जातो.

ज्यांच्या रुग्णांना वेळेवर रक्तपुरवठा होऊन जीव वाचलेला असतो याची जाणीव असलेल्या रुग्णांचे नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार आदी यांना स्वैच्छिक रक्तदानाचे महत्त्व पटलेले असते. त्यांनी पुढे येऊन या राष्ट्रीय कार्यात सहभागी झाले पाहिजे. रक्तदानाचे फायदे कॅन्सर, हार्टअँटक इ.धोका कमी असतो. तसेच कोलेस्टेरॉलचे प्रमाण आणि रक्तदाब नियंत्रणात राहतो. रस्त्यावर झालेला अपघातात अतिरक्तस्राव झालेला व्यक्ती, प्रसूती वेळी अथवा प्रसूतीनंतर अतिरक्तस्राव झालेल्या महिलेला वेळीच रक्त मिळाले तर नक्कीच त्यांचे प्राण वाचविल्याचे रक्तदाता म्हणून समाधान मिळते. या व्यतिरिक्त अँनेमिया, शस्त्रक्रिया, कर्करोग आदी रुग्णांना रक्ताची गरज भासते. यासाठी निश्वासर्थपणे स्वैच्छिक रक्तदाता म्हणून रक्तदान करणे महत्त्वाचे आहे. याच बरोबर थँलेसेमिया, सिकलसेल यासारखे दुर्मिळ आजाराने ग्रासलेल्या काही बालकांमध्ये जन्मजात रक्त तयार होण्याचे प्रमाण अत्यल्प कमी असते. त्यामुळे त्यांचे योग्य निदान करून वैद्यकीय सल्लानुसार रक्तपुरवठा केला जातो. अशा रुग्णांचे प्रमाण देशात भरपूर आहे. त्यांना महिन्यातून किमान दोन वेळेस तरी वैद्यकीय सल्ल्यानुसार रक्तपुरवठा केला जातो. अशा रुग्णांना वेळो वेळी रक्त द्यावे लागते, यासाठी आपली सर्वाची सामाजिक बांधिलकी नात्याने नैतिक जबाबदारी आहे. यासाठी आपण रक्तदान शिबिर अथवा रक्तकेंद्रात जावून शासन मान्यता प्राप्त रक्तपेढी/रक्तकेंद्रात आपले रक्तदाता म्हणून स्वैच्छिक रक्तदान महत्त्वाचे ठरते. यासाठी आपण कोणत्याही शासन मान्यताप्राप्त रक्तपेढी/रक्तकेंद्र येथून रक्त घेणे कधीही फायदेशीर आहे.

रक्तदाता म्हणून आपले वय १८-६० वर्षे पर्यंत व वजन ४८ किलो पेक्षा जास्त तसेच शरीरातील हिमोग्लोबिन योग्य प्रमाण (१२.५ टक्क्यांवर) असलेल्या निरोगी व्यक्ती रक्तदान करु शकता. तसेच शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार रक्तकेंद्रात अथवा रक्तदान शिबिरात विविध तपासणी करून रक्तसंकलन केले जाते. रक्ताच्या दिशानिर्देश नुसार सर्व चाचणी (एड्स, कावीळ अ, ब आणि गुप्तरोग, मलेरिया, रक्तगट, क्रासमँच इ.) केल्यानंतरच रुग्णांना सुरक्षित रक्तपुरवठा केला जातो. आपण केलेले स्वैच्छिक रक्तदान यासाठी शासन नियमानुसार दोन वर्षांतून एकदा मोफत रक्त मिळते. याचा लाभ आपण घेऊ शकता. रक्त हे जास्त काळ साठवून ठेवू शकत नाही (रक्तदान केल्यापासून फक्त ३५ दिवस) यासाठी रुग्णांना सतत रक्ताची गरज भासते.

१४ जून जागतिक रक्तदाता दिनानिमित्त एवढेच आपल्याला आवाहन करण्यात येते की, स्वैच्छिक रक्तदान ही काळाची गरज ओळखून आपल्या जवळच्या शासन मान्यता प्राप्त रक्तपेढीत आपण जबाबदार भारतीय नागरिक रक्तदाता म्हणून सामाजिक बांधिलकी जोपासून निश्वासर्थपणे स्वैच्छिक रक्तदान करावे.

**शासनाचे घोषवाक्य**

Give Blood, give plasma, share life, share often. रक्त द्या, प्लाझ्मा द्या, वारंवार द्या, एखाद्याच्या जीवनाचा हिस्सा बना!

१४ जून १८६८ रोजी जन्मलेल्या कार्ल लँडस्टेनर यांच्या जयंतीनिमित्त जागतिक रक्तदाता दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. एबीओ रक्तगट प्रणालीचा शोध घेऊन आरोग्य विज्ञानातील त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना नोबेल पारितोषिक देण्यात आले. सोशल माडिया, व्हॉट्सअॅपच्या ग्रुप च्या माध्यमातून रक्तदाता व्हाट्सएप ग्रुप तयार करून स्वैच्छिक रक्तदान चळवळ यशस्वीपणे रुजविता येऊ शकते.

जागतिक आरोग्य संघटना, इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रेड क्रॉस आणि रेड क्रिसेंट सोसायटीज यांच्या संयुक्त पुढाकाराने २००५ मध्ये पहिल्यांदा रक्तदाता दिन आयोजित करण्यात आला होता. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असताना स्वैच्छिक रक्तदान चळवळ जनजागृतीसाठी युवाशक्तींनी पुढे येणे काळाची गरज आहे. मानवी रक्ताची गरज कधीही न संपणारी असल्यामुळे रक्तदानाची प्रेरणा समाजात दृढ करणे, निरोगी रक्तदात्यांची फौज करून रक्तदात्यांमध्ये स्वैच्छिक रक्तदानाविषयी जनजागृती करणे, सामाजिक बांधिलकी जोपासून रक्तदात्यांविषयी कृतज्ञता निर्माण व्हावी. १४ जून जागतिक रक्तदाता दिनानिमित्ताने समाजात अथवा रक्तदात्यांमध्ये रक्तदानाविषयी जनजागृती व्हावी एवढाच उद्देश!

**लेखन : हेमकांत सोनार,**
**रक्तपेढी तंत्रज्ञ, जिल्हा शासकीय रक्तपेढी, जिल्हा सामान्य रुग्णालय,**
**संपादन : मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**

## आरोग्य प्रहर

### हे पदार्थ तणावमुक्त ठेवतात, आहारात करा समावेश!



आजकाल बहुतेक लोकांना कशाचा तरी त्रास होतो, कुणाला परीक्षेचं टेन्शन असतं, कुणी पैसे कमावण्यासाठी धावत असतं, कुणाचं कौटुंबिक आयुष्य चांगलं चालत नाही, कुणी ब्रेकअपमुळे रडत असतं. ताणतणावाची अनेक कारणे असू शकतात, पण त्यावर नियंत्रण ठेवले नाही तर ते आपल्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. तुम्हाला माहित आहे का की हेल्दी डाएट घेतल्याने तणावही दूर होऊ शकतो. चला तर मग जाणून घेऊया असे कोणते पदार्थ आहेत जे तुम्हाला तणावमुक्त राहण्यास मदत करतात.

**तणाव दूर करणारे पदार्थ**

* **हिरव्या पालेभाज्या :** जेव्हा जेव्हा आपण हिरव्या पालेभाज्यांबद्दल बोलतो तेव्हा पालकाचे नाव सर्वप्रथम आपल्या मनात येते. यामध्ये झिंक, मॅग्नेशियम, लोह आणि मँगनीज सारखे पोषक घटक असतात, जे मेंदूतील ऑक्सिजनची पातळी वाढवतात आणि आनंदी हॉर्मोन तयार करतात. यामुळे मूड सुधारण्यास खूप मदत होते.

* **फ्लॉवर :** फ्लॉवरसारखी दिसणारी ही भाजी अतिशय आरोग्यदायी मानली जाते, तुम्ही त्याची भाजी किंवा कोशिंबीर खाल्ली असेलच. फ्लॉवरमध्ये फोलेटअसते, जे नैराश्य दूर करण्यास खूप मदत करते.

* **सेलेरी :** हा एक आयुर्वेदिक मसाला आहे जो सामान्यत: पोटाची अस्वस्थता दूर करण्यासाठी वापरला जातो, परंतु फार कमी लोकांना हे माहित आहे की यामुळे आपला मूड सुधारू शकतो आणि त्याच्या सेवनाने आरामदायक झोप येते.

* **दूध :** दुधात जवळजवळ सर्व प्रकारचे पोषक घटक असतात, म्हणूनच त्याला संपूर्ण आहारदेखील म्हणतात. रोज दुधाचे सेवन केल्यास त्याचे शरीराला अनेक फायदे तर होतीलच, शिवाय डोकंही शांत राहील.

* **बदाम :** बदाम आपल्या मेंदूसाठी चांगले असतात हे आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. जर तुम्ही हे ड्रायफ्रूट्स नियमित खाल्ले तर ते मानसिक आरोग्यासाठी चांगले असेल आणि कोणताही ताणतणाव तुम्हाला येणार नाही.

**(येथे दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

# मुरुडमध्ये सात कोटींची विकासकामे

## आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरात तब्बल सात कोटींची विकासकामे, सुविधा करण्यात आल्या आहेत. त्यांचा लोकार्पण सोहळा अलिबाग-मुरुड मतदार संघाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी त्यांनी मुरुडच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी देऊन लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सदैव तत्पर राहणार असून लोकांना आवश्यकता आहे, अशी सर्व अशी कामे पूर्ण केल्याने मुरुडकर खुश आहेत. पर्यटनक्षेत्रात स्वच्छ व सुंदर मुरुड हे नाव आदराने घेतले जाईल, असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन केले.

मुरुडमध्ये प्रवासी शेड, पाणपोई, दत्तवाडी येथील गावठाण भागातील रस्त्याचे डांबरीकरण शुभारंभ, शहरातील अंतर्गत काँक्रिट रस्ते, सार्वजनिक शौचालय, मुरुड नगर परिषद शाळांचे नूतनीकरण करणे, अशी २२ विकासकामांचे लोकार्पण झाले. या २२ विकासकामांसाठी सात कोटी रुपये खर्च करण्यात येऊन ही सर्व कामे लोकांच्या सुविधासाठी खुली करण्यात आली आहेत. या वेळी जिल्हा



उपप्रमुख भरत बेलोसे, मुरुड तालुका संघटक दिनेश मिणमिने, अल्ताफ खतीब, आखिल खतीब, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, मुख्याधिकारी पंकज भुसे, समीर दौनाक, डॉ. वाशीम पेशिमाम, डॉ. सदफ पेशिमाम, माजी उपनगराध्यक्ष नौसीन दरोगे, माजी नगरसेवक गिरीश साळी, सागर चौलकर, सी. एम. ठाकूर, अरविंद गायकर, महेश भगत, महेश पाटील, माजी बांधकाम सभापती मेघाली पाटील, माजी नगराध्यक्ष अशोक धुमाळ, मोहन करंदेकर आदी उपस्थित होते.

मुरुड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून आज ती कामेसुद्धा पूर्ण झाली आहेत. मुरुड शहरामधील मुस्लिम समाजाच्या कामांनासुद्धा प्राधान्य दिले आहे. या समाजाचीसुद्धा सर्व कामे पूर्ण झाले असून नवीन कामांना कोट्यवधी रुपयांचा निधी प्राप्त करून दिला आहे. मुरुड नगर परिषदेवर शिवसेनेचे प्राबल्य राहण्यासाठी सर्व मुस्लिम समाजाने शिवसेनेला मत देऊन मुरुड नगर परिषद शिवसेनेला मिळण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत, असे आवाहन आमदार दळवी यांनी मुरुड शहरातील मुस्लिम महिला समाज हॉलचे भूमिपूजन करताना केले आहे. या समाज हॉलसाठी ७५ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. एक सुसज्ज दुमजली इमारत व बाजूला गार्डन निर्मिती करण्यात येणार आहे.

आमदार दळवी पुढे म्हणाले की, आमदारकी निवडणुकीत मुस्लिम समाजाने मला भरघोष मते दिली. त्या वेळी मी वचन दिले होते की, मुरुड शहराचा कायापालट करणार. दिलेले वचन पूर्ण करताना मुरुड शहराच्या विकासासाठी अमर्याद निधी देऊन शहरातील सर्व कामे पूर्ण करण्याचा विक्रम केला आहे. सत्ताबद्दल झाल्याने विकास कामांना मोठा निधी मिळू लागला आहे. लोकांनी शिवसेनेच्या पाठीशी खंबीर उभे रहावे. विकासकामांना निधी कमी पडणार नाही, अशी ग्वाही या वेळी त्यांनी दिली. विविध उद्घाटन कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

# पेणमध्ये आदिवासी वाडीवर दाखले वाटप

## ■ भाजपचे प्रसाद भोईर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पेण : प्रतिनिधी**

शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत आदिवासी बाधवांसाठी युवा नेते प्रसाद भोईर यांच्या पुढाकाराने गंगावणे आदिवासी वाडीवर दाखले वाटप कार्यक्रम झाला. पेण तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत शालेय दाखले, रेशन कार्डसंदर्भात समस्या व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन पेण तालुक्यातील गंगावणे आदिवासी वाडीवर करण्यात आले होते.



(छाया : इजाज मणियार)

या वेळी एकूण ७६ जातीचे दाख, ५३ जणांची आरोग्य तपासणी, २९ रेशनमेंट व रहिवासी दाखले, ग्रामपंचायत कुहीरे ८६ रेशनकार्ड वाटप, नवजात बालकांसाठी मातेला सहा शिशुकिट वाटप, तसेच आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांच्यामार्फत तीन आदिवासी बांधवांना दुसरा हप्ता रक्कम २५ हजार रुपये चेक वाटप करण्यात आले.

या वेळी पेणचे आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील, प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, पेणच्या तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, तालुका पुरवठा अधिकारी सुरेश थळे, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, नायब तहसीलदार नितीन परदेशी, युवा नेते प्रसाद भोईर, संजय भोईर, सर्व सर्कल अधिकारी तसेच तलाठी अधिकारी वर्ग कर्मचारी वर्ग, सरपंच, उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने गंगावणे विभागातील नागरिक उपस्थित होते.

या शिबिरात उत्पन्न दाखला, डोमिसाईल (अधिवास दाखला), रेशनकार्ड, पीएम. किसान केवायसी, जातीचा दाखला हे दाखले जागेवर देण्यात आले, तसेच नॉन क्रिमीलेयर दाखला जातीचा दाखला संदर्भातील अर्ज स्विकारले गेले. शिबिराचा गंगावणे आदिवासी वाडीवर आदिवासी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला.

आमदार धैर्यशील पाटील यांनी मोफत दाखले दिल्याबद्दल गंगावणे विभागातील आदिवासी नागरिकांनी भाजपचे युवा नेते प्रसाद भोईर मित्र मंडळाचे आभार मानले, तसेच अशी शिबिरे आदिवासी भागात लावावीत, असेही आदिवासी नागरिकांनी सांगितले.

# रोह्यात पावसाला जोरदार सुरुवात

## वाऱ्यामुळे वीजपुरवठा झाला खंडित

**रोहे : प्रतिनिधी**

गेल्या कित्येक दिवसांपासून पावसाची आतुरतेने वाट पाहत असतानाच अखेर सोमवारी (दि. १२) सायंकाळी रोह्यात पावसाने हजेरी लावली. पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाल्याने दिलासा मिळाला आहे, परंतु सोसाट्याचा वारा सुटला असल्याने गेले तीन दिवस विजेचा लंपाडाव सुरू होता.

बिपरजॉय वादळामुळे यावर्षी पाऊस कोकणात उशिराने दाखल झाला. असे असजे तरी जिल्ह्यातील अनेक ठिकाणी अद्यापही पावसाने हजेरी लावलेली नाही. रोह्यात प्रचंड उष्णता वाढल्याने नागरिक हैराण झाले होते. अखेर



सोमवारी सायंकाळी पावसाने हजेरी लावली. यामुळे हवेत गारवा निर्माण झाला. मंगळवारी सकाळीही पाऊस पडला. चक्रीवादळाच्या परिणामामुळे गेल्या तीन दिवसांपासून सोसाट्याचा वारा सुटला होता. यामुळे नेहमीप्रमाणे वीजेचा लपंडाव सुरू होता. हवेत गारवा निर्माण झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला. पावसाने हजेरी लावल्याने बळीराजा सुखावला आहे. दुसरीकडे नागरिकांनी छत्री, रेनकोट बाहेर काढल्याचे दिसून आले.

# श्रीवर्धन येथील मठाच्या स्मशानभूमीतील शेडची दुरवस्था

## ■ नगर परिषदेने लक्ष देण्याची मागणी

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन येथील मठाच्या स्मशानभूमीतील शेडची दुरवस्था झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून ही शेड पूर्णपणे मोडकळीस आलेली आहे. नगर परिषदेने या शेडकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

स्मशानभूमीमध्ये नगर परिषदेने गॅस शवदाहिनी कार्यान्वित केली आहे. या शेडचा उपयोग हा स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठी करायचा आहे, परंतु या स्मशानभूमीचे वॉल कंपाउंड बांधताना तसेच गॅस शवदाहिनीचे बांधकाम करताना संबंधित ठेकेदारांनी शेडमध्ये सिमेंट उतरवून ठेवलेले पहायला मिळत होते. सध्या श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर बांधण्यात आलेल्या धूप प्रतिबंधक सुशोभित बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे, परंतु शेड मोडकळीस आलेली असतानादेखील नगर परिषदेकडून या शेडची दुरुस्ती करण्यात येत नाही.

आता पावसाळा सुरू झाला असून अंत्यविधीसाठी जाणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठी स्मशानभूमीमध्ये जागा उपलब्ध नसल्याने नागरिकांचे हाल होणार आहेत तरी नगर परिषद प्रशासनान हे शेड तातडीने दुरुस्त करून घ्यावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.



# विशेष सुरक्षा मोहिमेंतर्गत खरोशी येथे विविध कार्यक्रम

**पेण : प्रतिनिधी**

भारतीय स्टेट बँकच्या पेणमधील विभागीय कार्यालयामार्फत आर्थिक सक्षमीकरणाद्वारे ग्रामपंचायत पातळीवर तीन महिन्याची विशेष सुरक्षा मोहिमेंतर्गत आरोग्य शिबिर, विद्यार्थी सत्कार, पॉलिसी वाटप कार्यक्रमाचे आयोजन खरोशी येथील जि. प. शाळेत करण्यात आले होते.



या वेळी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वतीने पेण तालुक्यातील अनेक भागात शिबिरे व योजनांबाबत जनजागृती करण्यात येत असून ग्रामीण भागातील नागरिकांच्या सक्षमीकरणासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन महाव्यवस्थापक मनोजकुमार सिन्हा यांनी केले.

या कार्यक्रमास उपमहाव्यवस्थापक सनातन मिश्रा, खरोशी सरपंच रुपाली पाटील, दूरशेत सरपंच दशरथ गावंड, सामाजिक कार्यकर्ते महेश पाटील, पेण शाखेचे व्यवस्थापक सुनील कुमार, विभागीय कार्यालय व्यवस्थापक मुकेश कुमार, समीर अग्रवाल, सचिन शेलगावकर, जिल्हा संमन्वयक प्रकाश तांबे, कृषी अधिकारी आर. डी. चव्हाण, ग्रामसेविका मालती पाडघे, सदस्य आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमहाव्यवस्थापक सनातन मिश्रा यांनी स्टेट बँकेमार्फत खरोशी गावात राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमास सरपंच व त्यांचे सहकारी यांनी विशेष सहकार्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानले, तसेच सरपंच रुपाली पाटील यांनीही आपले मनोगतातून बँकेच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

शिबिरात मधुमेह तपासणी, नाडी परीक्षण, रक्त तपासणी तसेच इतर आरोया तपासण्या करण्यात आल्या, तसेच गावातील दहावी, बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांना पुरस्कार

**चौक : प्रतिनिधी**

पत्रकार उत्कर्ष समितीच्या वतीने रायगड जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांना राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट शासकीय अधिकारी या पुरस्काराने कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

समाजात लोकाभिमुख, लोकहितासाठी आणि शासकिय कार्यालयांत सर्व सामान्य जनतेला उत्कृष्ठ जनसेवा देणाऱ्या अधिकारी, समाजसेवक, पत्रकार, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार पत्रकार उत्कर्ष समिती करीत आहे.


या वेळी राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट शासकिय अधिकारी म्हणून रायगड जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. मनोज सानप यांचे रायगड जिल्ह्यातील सर्व शासकिय कार्यालयातून तसेच पत्रकार व हितचिंतक व मित्र परिवार यांच्याकडून अभिनंदन करण्यात येत आहे.



# आंबा हंगाम अंतिम टप्प्यात

**खोपोली : प्रतिनिधी**

जून महिन्याच्या मध्यावर आता मान्सूनची चाहूल लागली आहे. त्यामुळे अलिबाग, पेण-वरसई तसेच कर्जत व पळसदरी या भागातून विक्रीसाठी येणाऱ्या आंब्याचे प्रमाण घटले आहे, मात्र गुजरातमधून येणारा बलसाड हापूस व केशर, कर्नाटकमधून येणारा आंबा मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी उपलब्ध होत आहे.



(छाया : जयवंत माडप)

कच्चा आंबा घेण्यासाठी खोपोलीतील बाजारपेठेमधील मारुती मंदिराजवळील आंबा विक्री बाजारात नागरिकांची मोठी गर्दी होत आहे, तसेच खास लोणच्यासाठी विक्री होत असलेला राजापुरी आंब्यालाही मोठी

### खरेदीची रेलचेल

मागणी आहे.

कच्चा हापूस आंबा आत्ता शेवटच्या टप्प्यात १५० रु. पासून १८० रुपये दरात उपलब्ध आहे. खोपोली शहरात रत्नागिरी, अलिबाग, पेण, कर्जत या भागातून प्रामुख्याने कच्चा हापूस आंबा विक्रीसाठी येतो. पावसाच्या पार्श्वभूमीवर संभाव्य नुकसान टाळण्यासाठी मागील तीन- चार दिवसापासून कच्च्या आंब्याची आवक वाढली आहे. सोबत तोतापुरी, राजापुरी, पायरी, केसर आंब्याचीही आवक वाढली आहे.

पाऊस सुरू होण्यापूर्वी आंबा खाण्याचा आनंद घेण्यासाठी व वर्षभर पुरेल असे लोणचे बनवून ठेवण्यासाठी आंबा खरेदी मोठ्या प्रमाणावर होत आहे.


**कुळगांव बदलापूर नगर परिषद**

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.

ईमेल :- kbmc123@gmail.com वेबसाईट :- http://kbmc.gov.in

कुबनप/आरोग्य/३४७/२०२३-२०२४ दिनांक : १३/०६/२०२३

**निविदा सूचना**

कुळगाव-बदलापूर नगर परिषद, हद्दीमध्ये खालील कामांसाठी नोंदणीकृत संस्था यांचेकडून ई-टेंडरिंग पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | निविदा प्रकार | निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | कुबनप हद्दीत फॉगिंग मशिनद्वारे प्रभाग निहाय डास प्रतिबंधक धुर फवारणी करणे. (स्वतःचे मशिन,मनुष्यबळ, किटकनाशक, पेट्रोल, डिझेल सह) | रु. १५०००/- | रु. १,५०,०००/- | ३ वर्षे |

निविदाफॉर्म दिनांक १३/०६/२०२३ ते दिनांक ०७/०७/२०२३ पर्यंत ई-टेंडरिंग (E-tendering) संगणक प्रणालीच्या कुबनप संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in प्राप्त होतील. निविदाफॉर्म फी व निविदा अनामत फी ऑनलाईन भरणेचे आहे. निविदाफॉर्म ऑनलाईन उपलब्ध होईल.

निविदेचे सादरीकरण दिनांक ०७/०७/२०२३ दुपारी ३.०० वाजेपर्यंत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर online सादर करणेचे आहे.

वरील प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या निविदा दिनांक १०/०७/२०२३ रोजी दुपारी ४.०० वा. किंवा अन्य सोयीच्या दिवशी निश्चित होईल त्या दिवशी दालनात उपस्थित संस्थांचे प्रतिनिधी/कंत्राटदार अथवा अधिकृत प्रतिनिधी समोर उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी, कुळगाव बदलापूर नगरपरिषद यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
कुळगांव बदलापूर नगरपरिषद,
कुळगांव


# 'जेएसएस'तर्फे घोषवाक्य स्पर्धा व कौशल्य मार्गदर्शन

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजगता मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या माध्यमातून जिल्हाभरात १ ते १५ जून या पंधरा दिवसांच्या कालावधीत जी २० जन भागीदारी अंतर्गत विविध उपक्रम घेण्यात येणार आहेत. त्यानिमित्ताने रोहा येथे सोमवारी (दि. १२) प्रशिक्षणार्थींसाठी घोषवाक्य स्पर्धा करण्यात आली. या वेळी कौशल्य विकासाबाबत मार्गदर्शनही केले गेले.

'जेएसएस'च्या संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा सोमय्या, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष गीतांजली ओक, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्याभरात संस्थेच्या माध्यमातून विविध कौशल्य उपक्रम राबिवले जात असताना केंद्र सरकारच्या कौशल्य विकास



व उद्योजकता मंत्रालयाच्या विशेष पुढाकारातून भारतभरात पंधरा दिवसीय जी-२० जन भागीदारी जनजागृती उपक्रम राबवले जात आहेत. त्या निमित्ताने रोहा येथे सोमवारी आयोजित घोषवाक्य स्पर्धेवेळी ग्रामपंचायत सदस्य राखी नाक्ती, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सुकन्या नांदगावकर व वेदांती पाटील, प्रशिक्षिका सारिका पाशिलकर व सीमा गुधळे तसेच प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

जी २० जन भागीदारीमध्ये भारतातील प्रत्येक नागरिकाची भूमिका व कर्तव्य सांगत असताना कौशल्य प्रशिक्षणात महिलांचा सक्रिय सहभाग व्हावा, अशी अपेक्षा कार्यक्रमात व्यक्त करण्यात आली.

# धार्मिक सलोख्यासाठी पालकांनो मुलांच्या मोबाईलवर लक्ष ठेवा!

## सोशल मीडियाद्वारे पोलिसांचे आवाहन



**कळंबोली : बातमीदार**

सोशल मीडियामध्ये वादग्रस्त व धार्मिक तेढ निर्माण करणारी पोस्ट व्हायरल झाल्याने सामाजिक तणाव निर्माण होऊन दंगल सदृश्य घटना राज्यात घडत आहेत. त्यामुळे सोशल मीडियाचा वापर करीत असताना पालकांनी आपल्या पाल्याच्या मोबाईल वापरावर लक्ष केंद्रित करून वादग्रस्त पोस्ट किंवा धार्मिक तेढ निर्माण करणारी पोस्ट आपला पाल्य करत तर नाही ना यासाठी पालकांनी आपल्या मुलांचे मोबाईल चेक करून धार्मिक सलोखा राखण्याचे आवाहन कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप गुजर यांनी सोशल मीडियाद्वारे नागरिकांना केले आहे.

सोशल मीडियासारखे अतिवेगवान प्रसारणाचे काम करण्याचे हत्यार म्हणून वापरले जात आहे, मात्र या सोशल मीडियातून धार्मिक तेढ निर्माण करणारी किंवा दोन धर्मांमध्ये सलोख्याला तडा जाणाऱ्या वादग्रस्त पोस्ट करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे जातीय व धार्मिक शांततेला तडा जाऊन राज्यात दंगल सदृश्य स्थिती काही वेळा निर्माण होऊ शकते. याकरता सोशल मीडिया वापरणाऱ्या सर्वांनीच जर एखादी धार्मिक तेढ निर्माण करणारी पोस्ट व्हायरल होत असेल तर ती अन्य कोणालाही न पाठवता त्याबाबत कळंबोली पोलीस ठाण्यात संपर्क साधून त्याबाबत तक्रार दाखल करावी.

समाजात शांतता, जातीय सलोखा, धार्मिक स्नेहबंध वाढावा यासाठी प्रत्येक नागरिकांनी राष्ट्रीय कर्तव्य म्हणून काम करावे व आपल्या सोशल मीडियावरचा वापर करताना काळजी घ्यावी. दोन धर्मात कोणत्याही प्रकारची तेढ निर्माण होईल अशा वादग्रस्त पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल करू नये. यासाठी प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांचे मोबाईल वारंवार तपासावे. किंवा त्यांच्याशी बातचीत करून याबाबत त्यांना समजावून सांगावे. वादग्रस्त ठरणाऱ्या व जातीय तणाव निर्माण करणाऱ्या सोशल मीडियावर फोटो अगर मजकूर कोणीही व्हायरल करू नये. यासाठी प्रत्येक पालकांनी काळजी घ्यावयाची आहे.

सोशल मीडिया किंवा एखाद्या ग्रुपचा डमिन किंवा फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम वर वादग्रस्त मजकूर किंवा फोटो व्हायरल करून सामाजिक अशांतता निर्माण करत असेल तर त्याची माहिती कळंबोली पोलिसांना तातडीने देऊन शासन व समाजाला सहकार्य करण्याचे आवाहन कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप गुजर यांनी सोशल मीडियाद्वारे कळंबोलीतील नागरिकांना आवाहन केले आहे.

# महाजनसंपर्क अभियानांतर्गत नवी मुंबईत आढावा बैठक





**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रातील सरकारने नऊ वर्षे पूर्ण केली आहेत. पंतप्रधानांच्या जलद निर्णयामुळे देशाच्या विकासकामांच्या उभारणीत मोदी सरकारचे महत्त्वपूर्ण योगदान देशाला पहावयास मिळत आहे. या निमित्ताने महाजनसंपर्क अभियान अंतर्गत आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली सीबीडी येथे आढावा बैठक झाली.

या बैठकीस भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. रामचंद्र घरत, महिला जिल्हाध्यक्ष दुर्गा ढोक, माजी महपौर जयवंत सुतार, माजी नगरसेवक दीपक पवार, महामंत्री डॉ. राजेश पाटील, विजय घाटे, राजेश रॉय, निलेश म्हात्रे, भाजप मीडिया सेल अध्यक्ष विनीत मोरे तसेच मंडळ अध्यक्ष, इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले की, नरेंद्र मोदी यांनी घेतलेले महत्त्वाकांक्षी निर्णयामुळे देशाची वाटचाल विकासाच्या मार्गाने जात आहे. त्यामुळे देश विदेशामध्ये आपल्या भारताची प्रतिमा कशी निर्माण केली याचा नऊ कलमी कार्यक्रम बेलापूर विधानसभा क्षेत्रात दिला आहे. त्याकरिता आढावा बैठकीचे आयोजन केले होते. या वेळी मार्गदर्शन म्हणून नवी मुंबईचे प्रभारी अतुल काळसेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

देशाच्या विकासासाठी जलदगतीने महत्त्वाकांक्षी निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतले आहेत. ते आज आम्ही महाजनसंपर्क अभियान अंतर्गत जनतेच्या घराघरापर्यंत पोहचविण्याचे कार्य करत आहोत. या निर्णयाचा जनतेला कसा फायदा होईल व यामुळे जास्तीत जास्त गोरगरीब तसेच विविध समाजातील जनता कशी जोडली जातील हे आम्ही या नऊ वर्षांच्या केलेल्या कार्य अहवालातून करीत आहोत.

# फुफ्फुसे विकसित नसलेल्या जुळ्या बाळांवर यशस्वी उपचार



**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील महापालिकेच्या माँसाहेब मिनाताई ठाकरे रुग्णालयातील एनआयसीयूमध्ये जन्मल्यापासून फुफ्फुसे पुरेशा प्रमाणात विकसित नसलेली सेक्टर ६ सारसोळे येथील रहिवासी सान्वी स्वप्नील मोहिते यांची जुळी बालके जीवनाशी तब्बल चार महिन्याची झुंज देत आता बरी होऊन घरी परतली आहेत.

यामध्ये नवी मुंबई महापालिकेच्या माँसाहेब मीनाताई ठाकरे रुग्णालयातील डॉक्टर्स आणि नर्सेस यांनी केलेल्या सुयोग्य उपचारांबद्दल व अविश्रांत मेहनतीबद्दल मोहिते परिवाराच्या वतीने त्यांचे मनापासून आभार मानण्यात आले असून महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनीही रुग्णालयाच्या संपूर्ण वैद्यकीय समूहाचे अभिनंदन केले आहे.

माँसाहेब मीनाताई ठाकरे रुग्णालय, नेरुळ येथून गेल्या वर्षभरात एनआयसीयू मध्ये ४४९ बालकांवर उपचार करण्यात आले असून त्यामध्ये १ कि.ग्रॅ. पेक्षा कमी वजनाच्या १५ बालकांवर तसेच १ ते १.५ कि.ग्रॅ. वजनाच्या ५१ बालकांवर यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. नवी मुंबई महापालिका रुग्णालय सेवेसाठी ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे.

# लोकलमधील सहप्रवाशाचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार



**नवी मुंबई : बातमीदार**

शहराची लाईफलाईन असलेल्या उपनगरी हार्बर लोकल ट्रेनमधून प्रवास करणारे नियमित प्रवासी एकनाथ माने यांना त्यांच्या सेवानिवृत्ती बद्दल सहकाऱ्यांनी ट्रेनमध्येच फेअरवेल पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या फेअरवेल पार्टी बघून सदर ट्रेन मधून प्रवास करणारे इतर प्रवासी आश्चर्यचकित झाले.

खांदेश्वर येथील रहिवासी असलेले एकनाथ माने (वय ६० वर्ष) ३० वर्षांहून अधिक काळ एकाच ट्रेन आणि डब्यातून सहकाऱ्यांसोबत ये-जा करीत असत. जवळपास तीन दशकांपासून डब्यातील परिचित चेहरा असलेले माने सहप्रवासी आणि इतर प्रवाशांशी मित्र म्हणून ओळखले जातात. मुंबईत एका खाजगी संस्थेत काम करणारे एकनाथ माने ३१ मे २०२३ रोजी नियम वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यामुळे लोकल ट्रेन मध्ये माने यांच्यासाठी त्यांच्या सहकारी प्रवाशांनी निरोप समारंभाचे आयोजन वेढले होते. त्यासाठी लक्ष्मण आगरकर यांनी पुढाकार घेतला.

आगरकरदेखील एक दशकाहुन अधिक काळ माने यांच्यासोबत प्रवास करीत आहेत. या वेळी माने यांचा शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



**नवी मुंबई : मां भारती वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने बेलापूरच्या इनकम टॅक्स कॉलनीजवळील गरजू मुलांना बॅगचे वाटप करण्यात आले. या वेळी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मनोजकुमार मौर्य, ॲड. सुनील कुमार, जवाहरलाल चौहान, भाजप उत्तर भारतीय मोर्चाचे अध्यक्ष अवधेश महतो, अंजू मौर्य, अनूप मौर्या, दीपा मौर्य, रमेश मौर्य, पूनम वालेचा, प्रवीण शाह, बिल्किस सुल्तान आदी उपस्थित होते.**

# कोकण भवनमध्ये लोकशाही दिनी पाच अर्ज निकाली

**नवी मुंबई :** कोकण विभागीय लोकशाही दिन कोकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. कोंकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या एक असून आज आलेल्या अर्जांची संख्या पाच असे एकूण प्राप्त अर्ज सहा होते. त्यापैकी पाच अर्ज निकाली काढण्यात आला. सध्या एक तक्रार प्रलंबित आहे. लोकशाही दिनानंतर महिला लोकशाही दिनाचे कामकाज झाले.

या वेळी उपायुक्त बापूराव भवाने, सहा. पोलीस निरीक्षक अतुल माळी, झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणाचे संजय किर्वे, नगर परिषदचे अधिक्षक अविनाश कुटे, मुंबई महापालिका प्रशासन अधिकारी संगीता पवार आदी अधिकारी उपस्थित होते.

# झाडाच्या फांदीमुळे नागरिकांसाठी तारेवरची कसरत; उद्यान विभाग सुस्त



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ सेक्टर १२ येथील पंडीत रामा भगत उद्यानातील झाडाची मोठी फांदी जॉगिंग ट्रॅक जागी मागील दोन दिवसापासून कोलमडून पडली आहे. त्यामुळे इथ जॉगिंग करिता आलेल्या नागरिकांना तारेवरची कसरत करत ये-जा करावे लागत आहे. उद्यानात येणाऱ्या नागरिकांना या बाबत उद्यान संबंधित अधिकाऱ्यांना कळवले आहे, मात्र मागील दोन दिवसांपासून फांदी जैसे थे स्थितीत असून उद्यान विभागाच्या सुस्त कारभाराबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

नेरूळ सेक्टर १२ येथील ठिकाणी नवी मुंबई मनपाचे पंडीत रामा भगत उद्यान आहे. इथ सकाळ आणि सायंकाळी मोठी गर्दी होत असते. व्यायामासह लहान मुलांची विविध प्रकारची खेळणी इथ असतात त्यामुळे उद्यान नेहमी गर्दीने भरलेले असते. या ठिकाणी चौकोनी आकाराचा जॉगिंग ट्रॅक आहे.

पावसाळ्यापूर्वी करण्यात येणारी वृक्ष लहरींपळ इथ करण्यात आली आहे, मात्र एका मोठ्या झाडाची मोठी फांदी जॉगिंग जागेच्या ठिकाणी आडवी पडलेली असून यामुळे नागरिकांना जॉगिंग करिता अडचण निर्माण होत असून मागील दोन दिवसांपासून जैसे थे स्थितीत असणारी मोठी फांदी उद्यान विभागने उचलावी, अशी मागणी केली जात आहे.

# ‘रोटरी’तर्फे पनवेल मनपामार्फत क्षयरुग्णांना प्रोटीन पावडरचे वाटप



**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

पंतप्रधान टीबीमुक्त भारत अभियानांतर्गत निक्षय पोषण कार्यक्रमांतर्गत रोटरी क्लब ऑफ खारघर यांच्याकडून नुकतेच पनवेल महापालिकेच्या माध्यमातून क्षयरुग्णांना प्रोटीन पावडरचे वाटप करण्यात आले. खारघर येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुमारे ७५ क्षय रूग्णांना दोन महिने पुरेल एवढ्या प्रोटीन पावडरचे वाटप उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, रोटरी क्लब ऑफ खारघरचे अध्यक्ष बाळशेखर छिलाना, नमिता छलिना, डॉ. प्रकाश मानाजी, डॉ. छाया तारळेकर, राजेश राठोड, रूबीना नायक महापालिकेचे वैद्यकिय अधिकारी डॉ. अनिल पाटील आदी उपस्थित होते. क्षय रूग्णांचे आजारादरम्यान वजन कमी होत असल्याने सकस आहार गरजेचा असतो. यासाठी पंतप्रधान टीबमुक्त भारत अभियानांतर्गत निक्षय पोषण कार्यक्रम राबविला जातो. या कार्यक्रमांतर्गत रोटरी क्लब ऑफ खारघर यांनी खारघर येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुमारे ७५ क्षयरुग्णांना दोन महिने पुरेल एवढ्या प्रोटीन पावडरीचे वाटप उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. या प्रोटीन पावडरीमुळे क्षय रूग्णांची रोग प्रतिकारक शक्ती वाढणार आहे.

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम या कार्यक्रमांतर्गत आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात ‘निक्षय मित्र’ संकल्पना राबविली जात आहे. या अंतर्गत क्षयरूग्णांना सामुदायिक सहाय्य करण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. क्षयरुग्णांना अतिरिक्त सहाय्य मिळावे यासाठी समाजातील विविध भागधारक जसे की विविध सामाजिक संस्था, निवडून आलेले प्रतिनिधी क्षय रूग्णांना सहाय्य करू शकतात. त्याचबरोबर कार्पोरेट कंपन्याही आपल्या व्यवसायिक सामाजिक जबाबदारी (सीएसआर) फंडातून क्षय रूग्णांना मदत करू शकतात. केंद्र शासनाने प्रधानमंत्री टि.बी. मुक्त भारत अभियान सूरू केले असून निक्षय मित्र बनून त्यांच्या मार्फत क्षयरूग्णांना सहा महिने ते तीन वर्षांसाठी कोरडा आहार पुरविण्यात येऊ शकतो.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस नुकताच झाला. त्याबद्दल कुष्ठरोग निवारण समिती, शांतिवनच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी शांतिवनचे चिफ सेक्रेटरी विनायक शिंदे, कार्यकर्ते निलकंठ कोळी, शरद घाणेकर, नारायण मढावी, शिमगी पवार, बाकाबाई आढे उपस्थित होते.**

# कोकण भवनमध्ये प्रलंबित प्रश्नांवर चर्चा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शासकीय अधिकारी वर्गाच्या प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्याकरिता गुरुवारी (दि. १५) सायंकाळी ४ वाजता नवी मुंबईतील कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या बैठकीस विभागीय कोंकण आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. बेलापूरमधील विविध कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकाऱ्यांनी बैठकीस उपस्थिती रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मासिक संगीत सभेत अक्षय वर्धावे यांचे गायन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे १९वे पुष्प पनवेल येथे झाले. श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रात झालेल्या या कार्यक्रमात कर्जत येथील अक्षय वर्धावे यांनी गायनसेवा केली. ’श्री’ या रागाने त्यानी संगीत सभेचा प्रारंभ केला. त्यानंतर त्यांनी राग ’गौडमल्हार’ सादर केला. नंतर ’अवधुता’ हे निर्गुणी भजन व ’सावरे अईजैईयो’ सादर करून प्रेक्षकांची प्रशंसा प्राप्त केली.

’ज्ञानियांच्या राजा’ हा अभंग सादर करून ’भाग्यदा लक्ष्मी बारम्मा’ या कन्नड भजनाने आपल्या गायन सेवेची सांगता केली. त्यांना ऋतुजा कर्वे-कुंटे यांनी संवादिनी व निषाद चिंचोले यांनी तबला साथ केली. पं. अरुण कशाळकर व पं. सुहास महाजन यांचे शिष्य असलेल्या अक्षय वर्धावे यांनी श्री कृती स्कूल ऑफ म्युझिक, हस्टन (टेक्सास), यूएसए येथे ’विभागप्रमुख’ म्हणून काम केले आहे. तसेच यूएसए साठी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या पाच परीक्षांचा अभ्यासक्रम तयार केला आहे.

’पंतप्रधान इच्छुक लेखक योजना’ येथे त्यांनी सादर केलेला भारतीय संस्कृतीतील ओंकार रहस्य या विषयावरील प्रबंध प्रमाणित करण्यात आला आहे.

# खोपोलीत स्वच्छतेबाबत पालिका उदासीन

## ■ मध्यवर्ती भाजीपाला मार्केटमध्ये घाणीचे साम्राज्य

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीतील विविध रहिवासी भागात स्वच्छता असो किंवा मध्यवर्ती भाजीपाला मार्केटमधील स्वच्छता या सर्व ठिकाणची स्थिती सारखीच बनली आहे. सर्वच ठिकाणी अस्वच्छता आहे. दोन दिवसांपूर्वी मान्सूनपूर्व एकाच पावसाने भाजी मार्केटमधील स्वच्छतेचे तीनतेरा वाजले आहेत.

भाजीपाला मार्केटमध्ये सर्वत्र चिखल व कचरा पडला असून नागरिकांना चालणे कठीण बनले आहे. सार्वजनिक स्वच्छतेबाबत पालिका प्रशासन व आरोग्य विभागच उदासीन असल्याचे दिसून येत आहे. अनेक प्रभागांत स्वच्छता राखण्यासाठी संबंधित विभागातील अधिकारीच दुर्लक्ष करीत असल्याची तक्रार माजी नगरसेवकांकडून केला जात आहे.



(छाया : जयवंत माडपे)

खोपोली शहरातील महात्मा फुले भाजी मार्केटमध्ये संपूर्ण शहर व तालुक्यातील नागरिकांचा राबता असतो. हे मार्केट खोपोलीतील सार्वजनिक स्वच्छतेचा आरसा असून येथील स्थिती भयानक असल्याने अन्य ठिकाणी काय याचा अंदाज सहज येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

शिळफाटा येथील अनेक रहिवासी भागांत स्वच्छता कर्मचारी व कचरा उचलण्यासाठी पालिकेची घंटागाडी नियमितपणे येत नसल्याने सर्वत्र अस्वच्छता व घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. अशीच स्थिती शहरातील अन्य रहिवासी भागांची असल्याने मोठ्या प्रमाणावर नागरिकांमध्ये पालिकेच्या स्वच्छता विभाग व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांविरोधात रोष वाढत आहे.

शहरातील रहिवासी भागातील गटारे तुडुंब भरून असतात. कचराकुंड्या वेळेवर रिकाम्या होत नसल्याने कुत्री व मोकाट प्राणी, डुकरे कुंड्यातील कचरा रस्त्यावर आणतात. भाजीपाला मार्केट परिसर, बाजारातील सार्वजनिक शौचालय व मुतारीची अवस्था तर अतिबिकट आहे.

रस्ते, सार्वजनिक चौक व उद्यान गार्डन सफाईबाबत पालिका प्रशासन पूर्ण उदासीन बनल्याने याही ठिकाणची अवस्थाही तशीच बिकट बनल्याने नागरिकांत प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. याबाबत खोपोली पालिकेतील संबंधित विभाग प्रमुख व अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे नागरिक तक्रार करतात. त्यांना मात्र टोलवाटोलवीची उत्तरे मिळत असल्याचा अनुभव नागरिकांना मिळत असल्याचे नागरिक सांगतात.

> **भाजीपाला मार्केटमध्ये शहर व तालुक्यातील नागरिक खरेदीसाठी येतात. येथील स्वच्छतेची स्थिती भयानक आहे. सर्व गटारे भरली असल्याने पाण्याचा निचरा होत नाही. दैनंदिन सफाईही व्यवस्थित होत नाही.**
>
> **–वसंत वझरकर, भाजीपाला मंडई कमिटी सदस्य**

> **भाजीपाला मार्केटची स्वच्छता राखण्यासाठी स्वतंत्र टीम नियुक्त करण्यात आली आहे. त्यांच्याकडून नियमितपणे सफाई करून कचरा उचलला जातो. व्यापाऱ्यांनी सुनियोजित कचरा व्यवस्थापन केल्यास येथील स्वच्छता राखण्यासाठी मोठी मदत होणार आहे.**
>
> **–प्रफुल्ल गायकवाड, स्वच्छता निरीक्षक, खोपोली नगरपालिका**


# पीएम किसान योजनेसाठी ई–केवायसी करून घ्यावे

## कृषी अधिकाऱ्यांचे लाभार्थ्यांना आवाहन

**चौक : प्रतिनिधी**

केंद्र शासनाकडून शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत एका वर्षासाठी सहा हजार असा निधी जमा होतो तसेच राज्य सरकारकडून दरवर्षी केंद्र सरकारच्या पीएम किसान निधी योजनेच्या धर्तीवर नमो शेतकरी सन्मान योजनेमधून सहा हजार याप्रमाणे एकूण एका वर्षात लाभार्थ्यास १२ हजार इतका निधी मिळणार आहे. त्यासाठी पात्र लाभार्थी यांनी ई–केवायसी करून घेणे गरजेचे असल्याचे खालापूर तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ यांनी एका पत्रकाद्वारे कळविले आहे.

पीएम किसान योजनेमधून शेतकऱ्यांना आतापर्यंत तेरा हप्ते जमा झाले आहेत. ज्या शेतकऱ्यांचे रजिस्ट्रेशन झाले असून सर्व दस्तऐवज परिपूर्ण आहेत व ई–केवायसी झाले आहे त्या शेतकऱ्यांना निधी जमा होत आहे.



अजूनही काही शेतकरी लाभार्थ्यांनी केवळ ई–केवायसी केले नसल्याने किंवा बँक खाते आधार संलग्न नसल्याने त्यांच्या खात्यात निधी जमा होत नाही. त्यांनी आपले ई–केवायसी करणे बंधनकारक आहे तसेच बँक खाते आधार संलग्न करणे आवश्यक आहे. यासाठी वेळोवेळी कृषी विभाग, ग्रामविकास विभाग व महसूल विभागामार्फत ई–केवायसी व आधार संलग्न करण्याचे काम करून घेण्यात आले आहे, परंतु बरेच शेतकरी हे कामानिमित्त बाहेरगावी विस्थापित झाले असल्याने अशा लाभार्थ्यांसाठी ई–केवायसी करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

यासाठी गुगल प्लेस्टोरवर उपलब्ध असलेल्या PMKisan GOI appद्वारे लाभार्थ्यांना ई–केवायसी करणे सुलभ झाले आहे. या सुविधेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना स्वत:चे ई–केवायसी प्रमाणीकरण तसेच इतर लाभार्थ्यांचेसुद्धा ई–केवायसी प्रमाणीकरण करता येणार आहे.

एका लॉगीनवरून १० जणांचे ई–केवायसी प्रमाणीकरण करता येऊ शकते. प्रलंबित ई–केवायसीधारकांची यादी तालुका कृषी अधिकारी कार्यालय खालापूर या ठिकाणी लावण्यात आली आहे.

अधिक माहितीसाठी कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा व जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ई–केवायसी प्रमाणीकरण पूर्ण करावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ–नारनवर यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना केले आहे.

## कर्जत–भिसेगाव जोड भुयारी मार्गासाठीचे उपोषण तात्पुरते स्थगित

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत भिसेगाव जोड भुयारी मार्गाकरिता सामाजिक कार्यकर्ते अमोघ कुलकर्णी सोमवारी (दि. १२) उपोषणास बसणार होते. याबाबत भिसेगाव ग्रामस्थ मंडळाने उपोषण स्थगित करावे, असे निवेदन कुळकर्णी यांना दिले. त्यामुळे हे उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

आमदार महेंद्र थोरवे यांनी ग्रामस्थांना उपोषण करू नये. भुयारी मार्गाबाबत लवकरात लवकर निधी उपलब्ध करून देत असल्याचे लेखी आश्वासन दिल्याने ग्रामस्थांनी उपोषण तात्पुरते स्थगित करण्याची विनंती कुळकर्णी यांना केली. त्यांनी ती मान्य केली आहे. उपोषण स्थगित केल्यानंतर कुळकर्णी यांनी, आपण सर्वांनी दिलेल्या पाठिंब्याने आणि आपण मिळून करीत असलेल्या पाठपुराव्याने मला आशा आहे की, भुयारी मार्गाचे काम आमदार थोरवे यांनी दिलेल्या शब्दानुसार लवकरात लवकर निधी उपलब्ध करून काम पूर्ण होईल. आपल्या एकजुटीमुळे याबाबत दखल घ्यावी लागली आहे. त्यामुळे आपल्या सर्वांच्या एकजुटीचा थोडाफार का होईना विजय झाला आहे. विश्वास आहे की, जे अडथळे असतील ते दूर होऊन लवकरात लवकर भुयारी मार्गाचे काम चालू होईल. म्हणजे पुन्हा उपोषण करण्याची वेळ येणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# माणगावमधील १२,६४० विद्यार्थ्यांना मिळणार मोफत पुस्तके



(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

शासनाच्या समग्र शिक्षा अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तक योजनेतून सन २०२३–२४ या शैक्षणिक वर्षाकरिता मोफत पाठ्यपुस्तके माणगाव तालुक्यातील विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी मोफत मिळणार आहेत. तालुक्यातील सर्व ३१६ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, माध्यमिक, खासगी अनुदानित व शासकीय आश्रमशाळा मिळून एकूण १२,६४० विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक योजनेचा लाभ मिळणार आहे.

समग्र शिक्षा अंतर्गत पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत यंदाच्या वर्षीही मोफत पाठ्यपुस्तके वितरीत करण्याची प्रक्रिया ९ जूनपासून सुरू झाली आहे. शासनाने विद्यार्थ्यांच्या पाठीवरील ओझे कमी करण्याच्या दृष्टीने पाऊल टाकले असून प्रत्येक विद्यार्थ्याला चार भागांची पुस्तके मिळणार आहेत. तालुक्यासाठी शासनाकडून ५२,२०५ एवढी पुस्तके प्राप्त झाली आहेत.

ही पुस्तके संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकामार्फत शाळा, विद्यालयांना मिळणार आहेत. शाळेचा पहिला दिवस १५ जून रोजी आहे. याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके मिळतील. त्यामुळे विद्यार्थी, पालकांमध्ये आनंद व्यक्त होत आहे.

## माणगावमध्ये नेत्रतपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावमध्ये शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन १४ जून रोजी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत बाळकृष्ण मेथा यांच्या हॉलमध्ये करण्यात आले आहे.

गेल्या वर्षभरापासून माणगावात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले जात आहे. तज्ज्ञ डॉक्टरांकडून या ठिकाणी नेत्ररुग्णांची तपासणी केली जात असून ज्यांना मोतीबिंदू आहे अशा नेत्ररुग्णांना पनवेल येथे आयोजकांच्याच गाडीत घेऊन जाऊन त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करून त्यांना पुन्हा माणगाव येथे आणले जाते. आतापर्यंत ८००हून अधिक मोतीबिंदू असणाऱ्या रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

या शिबिराला दर महिन्याला नेत्ररुग्णांचा मोठा असा प्रतिसाद लाभत आहे. शिबिर यशस्वी करण्यासाठी विजय मेथा, मनीष मेथा, विधिता मेथा, सुप्रिया शिंदे यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलची टीम विशेष परिश्रम घेत आहेत. या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरीब, गरजू लोकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## रोह्यात आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**रोहे : प्रतिनिधी**

येथील ब्राह्मण मंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून रविवारी (दि. ११) प्रिसटाईन इंडिया आयुर केअरच्या सौजन्याने नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये ८३ जणांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली.

आरोग्य शिबिराचे उद्घाटन डॉ. शंतनु आठवले यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिराला आमदार आदिती तटकरे, रोह्याचे माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र दिवेकर, गुजराथी समाज अध्यक्ष विलास गुजर, भाटे सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष किशोर तावडे, ज्वेलर्स असोसिएशनचे अध्यक्ष मनोज जैन, केमिस्ट असोसिएशन अध्यक्ष स्वप्नील धनावडे, ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग सरफळे, रोटरी क्लबचे असिस्टंट गव्हर्नर राकेश कागडा, रोहा अध्यक्ष सुरेंद्र निंबाळकर, दंतचिकित्सक डॉ. रूचा वागळे आदींनी सदिच्छा भेट दिली.

शिबिर यशस्वी होण्यासाठी ब्राह्मण मंडळाचे अध्यक्ष अमित आठवले, शिबिर संयोजिका विदुला परांजपे, मंडळ कार्यकारिणी, रौप्य महोत्सव समिती तसेच प्रिसटाईन इंडियाच्या टीमने परिश्रम घेतले.



(छाया : महादेव सरसंबे)

# मुरूडमध्ये पर्यटकांची गर्दी झाली कमी

**मुरूड : प्रतिनिधी**

१५ जूनपासून शाळा सुरू होत आहेत. त्यामुळे आताच शनिवार–रविवार हा शेवटचा वीकएण्ड असताना पर्यटकांनी मुरूड येथे फारशी गर्दी केली नाही. येणाऱ्या पर्यटकांपैकी सुमारे ३० टक्के पर्यटक येथे पहावयास मिळाले.

हवामानात थोडा बदल झाला असून समुद्रकिनारी जोरदार वारा त्याचप्रमाणे लाटा मोठ्या प्रमाणात किनाऱ्याला येऊन धडकत आहेत.

समुद्रात पोहणेसुद्धा मुश्किल होऊन बसले आहे. खबरदारी म्हणून किनाऱ्यावर सुरक्षारक्षक तैनात ठेवण्यात आले होते. रेवदंडा साळाव पुलावरून अवजड वाहतूक बंद असतानासुद्धा पर्यटकांनी आपल्या छोट्या गाडीसह मुरूड समुद्रकिनारा व काशीद समुद्रकिनारा गाठला होता. शेवटच्या वीकएण्डला मात्र पर्यटकांची फारशी गर्दी आढळली नाही.



# वातावरणातील बदलाने निसर्गप्रेमींना पर्वणी

**माणगाव : प्रतिनिधी**

सर्वसाधारणपणे ७ जूनपर्यंत कोकणात येणारा मान्सूनचा लांबल्याने वातावरणात बदल झाल्याचे दिसून येत आहे. १३ ते १४ तासांचा दिवस, स्वच्छ सूर्यप्रकाश, ऊन सावल्यांचा खेळ, प्रचंड उकाडा आणि सूर्योदय व सूर्यास्त याचे मनोहरी दृश्य यांची रसमिसळ गेल्या काही दिवसांपासून कोकणामध्ये अनुभवायला मिळत आहे.


दिवसा आकाश ढगाळ असते. पावसाचे वातावरण असल्याने आकाश भरून आलेले असते. काहीसे थंड आल्हाददायक वातावरण जून महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात जाणवते, मात्र या वर्षी पावसाळा लांबल्याने आकाश निरभ्र असून स्वच्छ सूर्यप्रकाश पडत आहे. अगदी पहाटे पाच वाजल्यापासून झुंजूमुंजू व्हायला सुरुवात होते. सायंकाळी सात–साडेसातपर्यंत लख्ख सूर्यप्रकाश पडत आहे. पहाटेचा सूर्योदय लवकर होत असल्याने तसेच आकाश निरभ्र असल्याने सकाळी आठ वाजल्यापासूनच ऊन जाणवायला सुरुवात होते. अगदी संध्याकाळी सहा वाजेपर्यंत उन्हाची तिरीप जाणवते. त्यामुळे जवळपास १३ ते १४ तासांचा मोठा दिवस अनुभवायला मिळत आहे.

पावसाळ्याच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छ सूर्यप्रकाश ढगाळ वातावरण होत असल्याने दुपारी अचानक ऊन–सावल्यांचा खेळही पहावयास मिळत आहे. मध्येच येणारे ढग सावली व उन्हाचा अनुभव देत असल्याने मनोहरी असे दृश्य सूर्योदय, सूर्यास्ताच्या पार्श्वभूमीवर पहायला मिळत आहे.

सूर्योदय–सूर्यास्ताच्या वेळी कोवळ्या किरणांमुळे आकाशात विविध रंगांची पार्श्वभूमी निर्माण होऊन सुंदर असे दृश्य दिसते. तीव्र उन्हाळा असला तरी सकाळ, संध्याकाळी दिसणारे सूर्योदय–सूर्यास्ताचे आभाळात मनोहरी असे दृश्य दिसत असून निसर्गप्रेमी कलाकारांना वेगळी पर्वणी लाभत आहे.

२१ जून हा सर्वांत मोठा दिवस असतो. २१ जूनच्या पार्श्वभूमीवर अलिकडे, पलिकडे काही दिवस मोठ्या दिवसांचा अनुभव येतो. साधारणपणे जून महिन्यात ढगाळ हवामान असते. यामुळे नेहमीच मोठ्या दिवसांचा अनुभव सहसा येत नाही. या वर्षी मात्र पाऊस लांबल्याने आकाश निरभ्र असल्याने जास्तीचा सूर्यप्रकाश व मोठा दिवस अनुभवयास मिळत आहे.





> **२१ जून सर्वांत मोठा दिवस असतो. या दिवसाच्या अलीकडील, पलिकडील काही दिवस मोठे दिनमान असते. या वर्षी पावसाळा लांबला असल्याने तसेच आकाश निरभ्र राहत असल्याने स्वच्छ व जास्त काळ दिनमानाचा अनुभव येत आहे. ही पूर्णतः नैसर्गिक बाब असून आकाशातील ढगाळ वातावरणामुळे ऊन, सावल्यांचा अनुभव तसेच सूर्योदय–सूर्यास्ताच्या वेळी प्रकाश किरणांमधून विविध रंगांचे भास होताना आपल्याला दिसतात.**
>
> **–भरत काळे, भूगोल शिक्षक**

> **अलिकडे काही दिवस सकाळ खूप लवकर सुरू होताना दिसते तसेच सायंकाळीही सात साडेसातपर्यंत संधीप्रकाश रेंगाळतो. यामुळे मोठा दिवस अनुभवायला मिळत आहे तसेच सूर्योदय–सूर्यास्त वेळी विविध रंगांच्या छटा दिसतात. हे दृश्य पाहणे फार आल्हाददायी असते.**
>
> **–विजय आरसे, निसर्गप्रेमी**

## रायगडात २८ जूनला डाक अदालत

**अलिबाग** : डाकघर रायगड विभाग अधीक्षक अलिबाग कार्यालयाद्वारे २८ जून रोजी सकाळी ११ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे.

या डाक अदालतीमध्ये रायगड विभागातील डाक सेवेसंबंधित तक्रार, समस्या ज्याचे निवारण सहा आठवड्याच्या कालावधीत झालेले नाही अशा टपाल, स्पीडपोस्ट, काऊंटर सेवा, बचत बँक, मनीऑर्डर संबधित तक्रारी विचारात घेतल्या जातील. तक्रारीत सविस्तर माहिती जसे दिनांक, ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार दाखल केली त्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा आदी असणे आवश्यक आहे.

इच्छुक ग्राहकांनी आपली तक्रार दोन प्रतींमध्ये अधीक्षक डाकघर रायगड विभाग यांच्याकडे २७ जूनपर्यंत पोहचतील अशा रितीने पाठवावी, असे आवाहन डाकघर रायगड विभाग अधीक्षक डॉ. संजय लिये यांनी केले आहे.

## आदिम जमातींची अभ्यास कार्यशाळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

जनजाती कार्य मंत्रालय भारत सरकारद्वारा प्रधानमंत्री पीव्हीटीजी डेव्हलपमेंट मिशन अंतर्गत आदिम जमाती कॉन्फरन्स कम एक्सपोजर व्हिजिट नवी दिल्ली येथे १० ते १४ जून या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

संपूर्ण भारतात एकूण ७५ आदिम जमाती आहे. त्यापैकी महाराष्ट्रामध्ये कातकरी, कोलाम व माडिया गोंड या तीन आदिम जमाती वास्तव्यास आहेत. रायगड जिल्ह्यात प्रामुख्याने कातकरी आदिम जमात मोठ्या प्रमाणात आहे.

या कार्यशाळेकरीता एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय पेणमार्फत रायगड जिल्ह्यातील दोन कातकरी बांधवांना कार्यशाळेत जाण्याची संधी मिळाली आहे. या देशस्तरीय कार्यशाळेमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याशी भेटण्याची व त्यांच्यासोबत चर्चा करण्याचे संधी मिळणार आहे तसेच राष्ट्रपती भवन व संसद भवन येथेही भेट देणार आहेत.

या कार्यशाळेकरिता कातकरी बांधवांना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेणच्या शशिकला अहिरराव यांनी शुभेच्छा देऊन ही टीम दिल्लीकडे रवाना झाली.

# भारताचा वेस्ट इंडिज दौरा जाहीर

## युवा खेळाडूंना संधी मिळण्याची शक्यता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप संपल्यानंतर भारतीय संघ आता वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर जाणार आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) या दौऱ्याचे वेळापत्रक जाहीर केले आहे. टीम इंडिया विंडीज दौऱ्यावर दोन कसोटी, तीन वन डे आणि पाच टी-२० सामने खेळणार आहे.

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेला १२ जुलैपासून डॉमिनिका येथे सुरुवात होणार आहे. २७ जुलैपासून तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका सुरू होणार आहे, तर पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेला ३ ऑगस्टपासून सुरुवात होणार आहे.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी आणि टी-२० मालिकेसाठी संघात अनेक बदल केले जाऊ शकतात. खराब कामगिरीमुळे चेतेश्वर पुजारा आणि उमेश यादव यांना संघातून वगळले जाऊ शकते. त्यांच्या जागी यशस्वी जैस्वाल आणि मुकेश कुमार यांचा वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी संघात समावेश केला जाऊ शकतो.



टी-२० मालिकेसाठी पूर्णपणे नवीन संघ पाठवला जाऊ शकतो. यामध्ये आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या काही खेळाडूंचाही समावेश होऊ शकतो. रिंकू सिंग आणि जितेश शर्मासारख्या खेळाडूंना टी-२० संघात संधी मिळू शकते. याशिवाय ऋतुराज गायकवाड आणि यशस्वी जैस्वाल यांनाही टी२० संघात स्थान मिळू शकते. आयपीएलमध्ये प्रदीर्घ कालावधीनंतर पुनरागमन करणाऱ्या मोहित शर्मालाही टीम इंडियामध्ये स्थान मिळू शकते. त्याचवेळी रोहित शर्मा, विराट कोहली यांना पुन्हा एकदा टी-२० संघाबाहेर ठेवले जाऊ शकते, तर सिराज आणि शमी यांना कामाचा ताण आणि आगामी एकदिवसीय विश्वचषक पाहता टी-२० मालिकेदरम्यान विश्रांती दिली जाऊ शकते.

### असे आहे वेळापत्रक

**कसोटी मालिका**

**पहिला सामना : १२ ते १६ जुलै, डॉमिनिका**
**दुसरा सामना : २० ते २४ जुलै, त्रिनिदाद**

**वन डे मालिका**

**पहिला सामना : २७ जुलै, बार्बाडोस**
**दुसरा सामना : २९ जुलै, बार्बाडोस**
**तिसरा सामना : १ ऑगस्ट, त्रिनिदाद**

**टी-२० मालिका**

**पहिला सामना : ४ ऑगस्ट, त्रिनिदाद**
**दुसरा सामना : ६ ऑगस्ट, गयाना**
**तिसरा सामना : ८ ऑगस्ट, गयाना**
**चौथा सामना : १२ ऑगस्ट, फ्लोरिडा**
**पाचवा सामना : १३ ऑगस्ट, फ्लोरिडा**

# विराटने स्वेच्छेने कर्णधारपद सोडले; गांगुलीचा खुलासा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) विराट कोहलीला कसोटी कर्णधारपद सोडण्यासाठी कुठलाही दबाव टाकला नव्हता. त्याने तो निर्णय स्वच्छेने घेतला, असे माजी भारतीय क्रिकेटपटू आणि बीसीसीआयचा अध्यक्ष सौरव गांगुली याने म्हटले आहे.

डब्ल्यूटीसी पराभवानंतर टीम इंडियाचा माजी कर्णधार आणि बीसीसीआय अध्यक्ष सौरव गांगुलीने दिलेल्या विशेष मुलाखतीत म्हटले की, दक्षिण आफ्रिका मालिका संपल्यानंतर विराट कोहलीने स्वतः कसोटी कर्णधारपद सोडले होते. आता बोलून काही फायदा नाही. विराटने कसोटी कर्णधारपद सोडण्यासाठी आम्ही पूर्णपणे तयार नव्हतो. हा त्याचा निर्णय होता. त्या वेळी कुणाला तरी कर्णधार बनवायचे होते. रोहित शर्मा हा सर्वोत्तम पर्याय होता.



डब्ल्यूटीसी फायनलमधील पराभवाबद्दल गांगुली म्हणाला, मला असा विश्वास आहे की रोहित शर्मा आणि मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड किमान २०२३च्या विश्वचषकापर्यंत भारतीय संघाचे नेतृत्व करतील. विश्वचषकानंतर रोहितच्या मनात काय आहे आणि त्याला काय करायचे आहे हे मला माहीत नाही. प्रशिक्षक आणि आमच्यासाठी कर्णधार हे दोघे सर्वोत्कृष्ट आहेत आणि मी त्यांना शुभेच्छा देतो.

२०२१ च्या टी-२० विश्वचषकापूर्वी, विराट कोहलीने जाहीर केले की तो स्पर्धेनंतर बहुतेक फॉरमॅटचे कर्णधारपद सोडणार आहे. तेव्हा विराटने स्पष्टपणे सांगितले होते की, त्याला कसोटी क्रिकेटमध्ये कर्णधारपद पुढे चालू ठेवायचे आहे, परंतु बीसीसीआयला वनडे आणि टी-२० फॉरमॅटमध्ये वेगळे कर्णधार हवे होते. अशा स्थितीत विराटकडून वनडे संघाचे कर्णधारपद काढून घेण्यात आले.

यानंतर दक्षिण आफ्रिका दौऱ्याच्या सुरुवातीलाच विराट कोहलीने पत्रकार परिषदेत धक्कादायक खुलासा केला. तो म्हणाला होता, जेव्हा दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी कसोटी संघ निवडला जात होता, तेव्हा मला बैठकीला बोलावण्यात आले होते. कसोटी संघाबाबत निवडकर्त्यांशी चर्चा करण्यात आली, मात्र बैठकीअंती मला एकदिवसीय संघाच्या कर्णधारपदावरून हटवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. मी निवडकर्त्यांचा निर्णय मान्य केला.

# अश्विनकडून संघाची पाठराखण



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अनुभवी अष्टपैलू खेळाडू रविचंद्रन अश्विनने आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाकडून भारताचा दारुण पराभव झाल्यानंतर पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे. विशेष म्हणजे या महत्त्वपूर्ण सामन्यासाठी संधी न मिळूनही त्याने आपल्या संघाची पाठराखण केली आहे.

'डब्ल्यूटीसी फायनल जिंकल्याबद्दल ऑस्ट्रेलियाचे अभिनंदन. शेवट पराभवाने होणे निराशाजनक आहे, तरीही येथे प्रथम स्थानावर येण्यासाठी गेल्या दोन वर्षांमध्ये एक चांगला प्रयत्न आम्ही केला. सगळा गोंधळ आणि टीकांमध्ये मला असे वाटते की, यंदा खेळलेल्या माझ्या सर्व संघ सहकाऱ्यांचे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे खडकाप्रमाणे टिकून राहिलेल्या प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफचे कौतुक करणे महत्त्वाचे आहे,' असे ट्विट अश्विनने केले.

सचिन तेंडुलकरपासून ते गावसकर, हरभजन अशा प्रत्येकानेच अश्विनला भारतीय प्लेइंग इलेव्हनमधून बाहेर हे समजत नाही, असे म्हणत रोहित, द्रविड व संघनिवडीतील सदस्यांना टार्गेट केले होते.

# टेनिस क्रमवारीत जोकोव्हिच पुन्हा अग्रस्थानी

**पॅरिस : वृत्तसंस्था**

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेतील पुरुष एकेरीच्या विजेतेपदासह विक्रमी २३वा ग्रँडस्लॅम जिंकणारा नोव्हाक जोकोव्हिच 'एटीपी' क्रमवारीत स्पेनच्या कार्लोस अल्कराझला मागे टाकत पुन्हा एकदा अग्रस्थानी पोहचला आहे. ५० वर्षांहून अधिक काळापूर्वी सुरू झालेल्या संगणकीकृत क्रमवारीत सर्वाधिक काळ शीर्षस्थानी राहणारा पुरुष किंवा महिला खेळाडूचा विक्रम आपल्या नावे करणारा जोकोव्हिच आपल्या विक्रमात आणखी सुधार करेल.



जोकोव्हिच फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकाचा खेळाडू म्हणून सहभागी झाला होता. अंतिम सामन्यात कॅस्पर रूडला ७-६ (७-१), ६-३, ७-५ असे पराभूत करण्यात जोकोव्हिचला यश मिळाले. सध्या 'एटीपी' क्रमवारीत अल्कराझ दुसऱ्या आणि डॅनिल मेदवेदेव तिसऱ्या स्थानी आहे, तर रूडने आपले चौथे स्थान कायम ठेवले आहे.

दुखापतींचा सामना करीत असलेला स्पेनचा राफेल नदाल शीर्ष १०० खेळाडूंच्याही बाहेर फेकला गेला आहे. तो सध्या १३६व्या स्थानावर आहे.महिला एकेरीचे जेतेपद पटकावणारी पोलंडची इगा श्वीऑनटेक 'डब्ल्यूटीए' क्रमवारीत अग्रस्थानी कायम आहे.

# सुनील गावसकरांची टीम इंडियावर टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघ सलग दुसऱ्यांदा वर्ल्ड टेस्ट अजिंक्यपद २०२३ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पोहचला, मात्र त्यांना किताब जिंकता आला नाही. ऑस्ट्रेलियाने भारताला २०९ धावांनी पराभूत केले. या सामन्यासाठी भारताने दिग्गज फिरकीपटू आर. अश्विन याचा प्लेइंग इलेव्हनमध्ये समावेश केला नव्हता. त्यामुळे भारतावर अनेक दिग्गजांपासून ते चाहत्यांपर्यंत टीकास्त्र डागले. आता यामध्ये दिग्गज फलंदाज सुनील गावसकर यांचाही समावेश झाला आहे. बीसीसीआयने जाहीर केलेल्या वेस्ट इंडीजच्या दौऱ्यावर टीका केली आहे.

माजी खेळाडू गावसकर म्हणाले की, ऑस्ट्रेलियासारख्या मोठ्या संघांविरुद्धच्या आयसीसी सामन्यांमध्ये टीम इंडियाने आपल्या चुकांची पुनरावृत्ती करीत खराब प्रदर्शन केले. त्यामुळे वेस्ट इंडिजसारख्या दुबळ्या संघांविरुद्धच्या द्विपक्षीय मालिकेत विजय मिळवण्याचा काहीच अर्थ नाही. मोठ्या संघांविरुद्ध मोठ्या सामन्यांमध्ये जर तुम्ही खराब कामगिरीनंतरही काहीही बदल करणार नसाल, तर अशा दौऱ्यांना काहीही अर्थ राहत नाही.

# एशिया कपमध्ये भारताकडून हाँगकाँगचा धुव्वा



**मॉँगकॉक : वृत्तसंस्था**

एशियन क्रिकेट काऊंसिलकडून महिला इमर्जिंग टीम कपचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये टीम इंडियाच्या महिलांनी उत्तम खेळी करीत हाँगकाँगचा पराभव केला. या सामन्यात भारतीय गोलंदाजांच्या फिरकीपुढे हाँगकाँग संघ अवघ्या ३४ धावांवर गारद झाला. यानंतर भारताने नऊ विकेट्सने विजय साकारला.

या टी-२० सामन्यात हाँगकाँगच्या मुलींची खराब फलंदाजी पहायला मिळाली. हाँगकाँगकडून मॅरिको हिलने सर्वाधिक १४ धावा केल्या. याशिवाय माराना लॅमलोलाने पाच, सलामीवीर नताशा माईल्सने दोन, तर शानझिन शहजादने एक धाव केली. या संघाच्या चार फलंदाज मरिना लॅम्पो, ॲलिसा हर्बड, मरियम बीबी, बेटी चॅन यांना भोपळाही फोडणे शक्य झाले नाही. अखेर ३४ धावसंख्येवर हाँगकाँगचा डाव आटोपला. टीम इंडियाची श्रेयांका पाटील दोन षटकांत अवघ्या तीन धावा देत पाच विकेट्स घेतल्या.

सोप्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या भारतीय संघाने अवघ्या ५.२ षटकांमध्ये सामना जिंकला. कर्णधार श्वेता सेहरावतने दोन धावा करून बाद झाली. यानंतर यू छेत्री आणि त्रिशाने संघाला विजय मिळवून दिला. श्रेयांका पाटीलला शानदार गोलंदाजीबद्दल सामनावीरचा किताब देऊन गौरविण्यात आले.

# चीनने मेस्सीला ठेवले ताटकळत

**बीजिंग : वृत्तसंस्था**

फुटबॉल सुपरस्टार लिओनेल मेस्सीला चीनच्या पोलिसांनी बीजिंग विमानतळावर ताटकळत ठेवले. मेस्सीला त्याच्या व्हिसामध्ये काही समस्या असल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. सुमारे ३० मिनिटांनंतर प्रकरण मिटले आणि मेस्सी बाहेर पडला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

मेस्सीच्या पासपोर्टमुळे हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे चीनच्या सीमा पोलिसांनी मेस्सीला विमानतळावर रोखले. अर्जेंटिना गुरुवारी (दि. १५) बीजिंगमधील वर्कर्स स्टेडियमवर आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामन्यात ऑस्ट्रेलियाशी भिडणार आहे.






# तुषार देशपांडेचा साखरपुडा

**मुंबई : प्रतिनिधी**

ऋतुराज गायकवाडनंतर चेन्नई सुपरकिंग्सचा आणखी एक क्रिकेटपटू लवकरच विवाहबंधनात अडकणार आहे. मराठमोळा तुषार देशपांडेचा सोमवारी (दि. १३) मुंबईत साखरपुडा झाला. त्याने इन्स्टाग्रामवर फोटो शेअर करीत याबद्दल माहिती दिली आहे.



चेन्नई सुपर किंग्जचा वेगवान गोलंदाज तुषार देशपांडेने नभा गड्डमवारबरोबर एंगेजमेंट केली. इंडियन प्रीमियर लीग २०२३चे चॅम्पियन बनल्यानंतर अवघ्या काही दिवसांनी महाराष्ट्रातील २८ वर्षीय क्रिकेटपटूने आपल्या आयुष्यातील दुसरी इनिंग सुरू केली आहे. शाळेतील क्रश ते आता 'फायनान्स' म्हणून तिचे प्रमोशन झालेय, असे कॅप्शन तुषारने फोटो शेअर करताना दिले. साखरपुड्याच्या फोटोंमध्ये तुषार व नभा खूप सुंदर दिसत आहेत. तुषारने शेरवानी घातली आहे, तर नभा साऊथ इंडियन लूकमध्ये पाहायला मिळाली. दोघांच्या फोटोंवर चाहत्यांबरोबरच त्याचे खेळाडू मित्रही कमेंट्स करून शुभेच्छा देत आहेत.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com